भारतीय स्वातंत्र्य • साधना साप्ताहिक ६० हीरकमहोत्सव

संस्थापक : साने गुरुजी

# साधना

शनिवार
५ जानेवारी २००८
मूल्य रु. ८/-




बेनझीर भुट्टोंच्याबद्दल अनेक प्रश्नचिन्हं आहेत आणि ते रास्तही आहेत. मात्र त्यांचे पाकिस्तानात सत्तेवर येणे हे तेथील हुकुमशाही व दहशतवादाला उत्तर ठरण्याची शक्यता होती. पाकिस्तानच्या इतिहासाची पाने अजूनही रक्तरंजितच आहेत आणि भारतीय उपखंडातील लोकशाहीच्या वाटचालीवर चिंताजनक प्रभाव टाकणारी ही घटना आहे!

अंतरंग :


- शाळा सुटली, पाटी फुटली – **वसंत आबाजी डहाके**
- आता, पहिल्यासारख्या समंजस राहिल्या नाहीत चिमण्या! – **राजन गवस**
- अलौकिक चिकित्सक – **सुभाष भेण्डे**
- जागतिकीकरण : भांडवलाचं आणि सामान्य माणसांचं – **अशोक राजवाडे**
- वाचणाऱ्याची रोजनिशी – **सतीश काळसेकर**
- विकास आणि भावनिक मुद्यांना गुजराथी जनतेची साथ – **दीपक जाधव**
- पुस्तक परिचय – **ग. प्र. प्रधान**
- साधना शिफारस – **संतोष शेणई**
- दिल्ली दरवाजातून – **निरीक्षक**
- तिरकस-चौकस – **हेरंब कुलकर्णी**

वसंत
आबाजी
डहाके

# सुटलेली शाळा, फुटलेली पाटी...

आपला देश विविधतेनं नटलेला आहे यात शंका नाही. भिन्न भिन्न भाषा, भिन्न भिन्न भाषिक प्रश्न, त्यावरून होणाऱ्या भिन्न भिन्न दंगली! शेकडो जाती, विविध जातींची विविध प्रमाणपत्रं. आरक्षणासाठी एखादी जात पात्र ठरावी यासाठी आंदोलनं, त्या जातीला आरक्षण मिळू नये म्हणून होणारी आंदोलनं. वेगवेगळे धर्म, त्या त्या धर्मातल्या लोकांनी वेगवेगळ्या कारणांसाठी संवेदनशील होणं. त्या संवेदनशीलतेचेही भिन्न भिन्न अवतार. रस्ते रोखणं, वाहनं पेटवून देणं. निरनिराळ्या गटांचे निरनिराळे महापुरुष. त्यांना योग्य ती प्रतिष्ठा दिली नाही म्हणून होणाऱ्या तोडफोडी-जाळपोळीचेही भिन्न भिन्न आविष्कार. या सगळ्या गोष्टी इतक्या जोरात आदळत असतात की मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रांत वेगवेगळ्या गोष्टी घडत आहेत याची जाणीवही बोथट बनते. किंवा घडत नसतीलच असंही वाटत राहतं.



अशा वातावरणात मूल जन्माला येतं, ते थोडं वाढतं, मग शाळेत जातं. शाळांचेही भिन्न भिन्न प्रकार. झोपडीवजा, टिनटप्परवाली, पावसाळ्यात गळणारी, बसायला बाकं नसलेली, मोडकी बाकं असलेली, मळक्या-उदास भिंती असलेली, पानाच्या पिचकाऱ्या असलेली, जमीन उकरलेली, अंधाऱ्या खोल्यांची- विविध प्रकारच्या शाळा. जिल्हा परिषदेची, नगरपालिकेची, खाजगी संस्थेची शाळा आणि पॉश इंटरनॅशनल स्कूल. राहण्याच्या आणि ज्ञानग्रहणाच्या अद्ययावत सुविधा असलेली. गरीब शाळा, श्रीमंत शाळा. खडखडणारी एसटी बस आणि थंडगार वोल्वो. पाशिंजर गाडी आणि सुपर डिलक्स. ओढताना दमछाक करणारी सायकल रिक्षा आणि टोयोटा कार. लो बजेट फिल्म आणि मल्टिमिल्यनवाली. धी न्यू हिंदू होटल आणि सप्ततारांकित. गल्लीतला पुढारी आणि दिल्लीतला नेता. तीन रुपयांचा चहा आणि दीडशे रुपयांचा टी. विविधता म्हणजे किती प्रकारची.

अशा परिस्थितीत एखादं पोरगं घरून बसायचं पटकूर आणि पाटी-पेनसल घेऊन शाळेत येतं. एकाचवेळी दोन-तीन वर्गांना शिकवणारे मास्तर आलेले असतात किंवा आलेले नसतात. उत्तमोत्तम पोषाख केलेले अध्यापक थोड्या मुलांना सुसज्ज खोलीत शिकवत असतात. वर्गात जागा नाही म्हणून मुलं दाटीवाटीनं बसलेली असतात आणि वाढत्या गोंगाटात काहीतरी शिकत असतात किंवा शिकत नसतात. कधीकधी तर मुलं शाळेकडे जातात तर शाळाच जागेवर नसते किंवा कडेकोट बंद असते आणि उग्र पहारेकरी उभे असतात. शाळा चालवणं परवडत नाही म्हणून मॉल उभारण्यासाठी जागा दिली आहे अशी कुजबुज चालते. कधीकधी तर खिचडी मिळाली की मुलं घरी जातात. कधीकधी तर खिचडीदेखील मिळत नाही. आलेलं धान्य उंदरांनी फस्त केलं म्हणतात. आपल्याकडचे उंदीरही भिन्न भिन्न प्रकारचे आहेत. काळे, भुरे, रोड, लठ्ठ, किरटे, थोराड. कधीकधी तर अळ्यांना, किटकांना धान्यात स्वैर विहार करावा असं वाटतं.

शिजवणाऱ्यांना चष्मे पुरवले गेलेले नसल्यानं त्यांना ते दिसत नसतात. गरिबीतून आलेल्यांची, नाना प्रकारच्या तडजोडी कराव्या लागलेल्यांची दृष्टी अधू झालेली असते. कधीकधी तर त्यांना हेही दिसत नाही की काल चांगल्या धान्याची पोती इथं होती ती आज कुठं गेली. आपल्याकडचे दृष्टिभ्रमदेखील भिन्न भिन्न प्रकारचे असतात. पुष्कळांना माणसं दिसतच नाहीत, धर्म दिसतात, जाती दिसतात. नि:सत्व अन्न खाल्ल्यामुळे दृष्टी मंद होते. आपल्यासारख्या कृषिप्रधान देशात धान्याच्या पुष्कळ चांगल्या जाती असतात, परंतु त्यांना तांबेरा किंवा तत्सम आजार जडतात.

अशा परिस्थितीत एखादा मुलगा किंवा मुलगी शिकायला पाहिजे म्हणून शाळेत येते, बापानं धाडलं म्हणून येते, घरच्या किंवा शेताच्या कष्टांतून सुटका म्हणून येते. एखाद्या मुलाच्या डोळ्यांसमोर लहानपणापासूनच करिअर धरलं जात असतं. मग त्याला चांगली शाळा, चांगला क्लास हे सगळं करावंच लागतं. आपल्याकडे शिक्षकांना, प्राध्यापकांना, शिक्षणतज्ज्ञांना शिक्षणसंस्था काढाव्या असं वाटत नाही. मग नाईलाजानं, जनतेचं कल्याण व्हावं म्हणून, राजकारणातल्या लोकांना त्या काढाव्या लागतात किंवा कधी शिक्षणसंस्था काढल्यानंतर राजकारणात जावं लागतं. त्यामुळे आमच्या देशातल्या तरुण मुलांना आपल्या देशातच शिकावं असं वाटत नाही. शिक्षणतज्ज्ञांनी शाळा-कॉलेजं काढली असती तर ती मुलं इथंच शिकली असती. आपल्याकडच्या रोजगाराचाही प्रॉब्लेमच आहे. म्हणून तिकडे शिकणाऱ्यांना तिकडेच शिकून नोकरी करीत राहावं लागतं. त्यांना आपल्या देशाबद्दल, संस्कृतीबद्दल, भाषेबद्दल फार प्रेम असतं. तिकडे राहूनच ते आपलं प्रेम व्यक्तही करत असतात. मग आपल्यालाच तिकडे जाऊन सांस्कृतिक महोत्सव करावे लागतात. ही मुलं तिकडेच राहताहेत हे फार बरं असंही कधीकधी वाटतं. इकडे येऊन काही नोकरी किंवा उद्योग त्यांना करावा असं

(पृष्ठ १५ वर

# बेटी पाकिस्तानकी!

आंतरराष्ट्रीय दहशतवादाची सूत्रे पाकिस्तानातून हलवली जात असतात. वात पेटवून दुसऱ्या देशात बाँब फेकणाऱ्यांना त्यामुळे इतरांचे कसे व किती नुकसान होत आहे याची फिकीर नसते. हा विस्तवाशी चाललेला खेळ आहे, असा वर्षानुवर्षे इशारा देऊनही उपयोग होत नव्हता. परंतु ज्यांनी हे बीज पेरले वा दशहतवाद्यांकडे दुर्लक्ष केले, त्यांच्यावरच हा भस्मासूर उलटला आहे. बेनझीर भुत्तो दोन वेळा पाकिस्तानच्या पंतप्रधान बनल्या; परंतु या काळात भारत-पाक जवळ आले, अशातला भाग नाही. पाकव्याप्त काश्मीरला भेट देऊन त्यांनी 'आझादी'ची नारेबाजी केली होती. त्या पंतप्रधान असतानाही पाकमध्ये अतिरेकी तळ होते व जम्मू-काश्मीरात घुसखोरी सुरू होती. कोणताही पाक नेता भारताशी खुली मैत्री करू शकत नव्हता, असे तेव्हाचे वातावरण होते. लष्कर व आय.एस.आय. बेनझीरविरोधी होते. त्यांची 'समजूत' काढण्यासाठी भारताला शिव्याशाप देणे त्यांना भागही होते. पण त्यांचा हा देखावा असल्याचे न कळण्याइतके लष्कर व आय.एस.आय. दुधखुळे नव्हते. बेनझीरने भारताबरोबर एकमेकांच्या आण्विक केंद्रांना लक्ष्य न करण्याचा व माहितीच्या देवघेवीचा करार केला होता, तेव्हा राजीव गांधी सत्तेवर होते. या दोन तरुण नेत्यांमुळे उभय देश निकट येण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली होती. 'या वाटाघाटीत बेनझीर यांनी पाकिस्तानच्या वतीने दिलेले शब्द पाळले नाहीत', असा आरोप भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एम.के. नारायणन यांनी एका चॅनेलला दिलेल्या मुलाखतीस केला होता. त्यावर 'राजीव गांधी यांनीच सियाचिनबाबत मला दिलेले आश्वासन पाळले नव्हते; परंतु मी त्याबद्दल आजतागायत कधी जाहीर विधान केले नव्हते', असा खुलासा बेनझीरने केला. त्या देशविदेशांतील मध्यमवर्गीय व बुद्धिमंतांच्या लाडक्या होत्या. परदेशात शिकलेल्या, आंग्लविद्याविभूषित आणि सोफेस्टिकेटेड असल्याने, त्यांनी आपली विशिष्ट प्रतिमा निर्माण केली होती.

इंदिरा गांधींना पूर्वी 'गुँगी गुडिया' असे संबोधिले जात असे. त्यांनीच पुढे काँग्रेसमधील सिंडिकेटवाल्यांना बाजूला सारले व पक्ष आणि सरकारवर आपले एकछत्री साम्राज्य स्थापन केले. बेनझीर आपले पिता झुल्फिकार अली भुत्तो यांच्यासमवेत सिमला वाटाघाटींच्या वेळी भारतात आल्या होत्या. तेव्हा त्या २० वर्षांच्या आसपास होत्या व ही कोवळी, मुग्ध तरुणी उद्या पाकिस्तानात सत्तेवर येईल, असे कोणाला त्यावेळी स्वप्नातही वाटले नसेल. इंदिरा गांधी व बेनझीर दोघीही श्रीमंत उच्चवर्गातल्या, इंदिराजींप्रमाणे त्यांच्याकडेही करिष्मा होता. उभयता अत्यंत आक्रमण व झुंजार, परराष्ट्र राजकारणावर दोघींची पकड. बेनझीर यांच्याकडे बुद्धिचातुर्य, तर्कशुद्ध विचार करण्याचे व ते प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्य होते. त्यांचे वाचन उत्तम होते व त्या लिहितही छान. परंतु इंदिराजी देशाच्या कानाकोपऱ्यात व गोरगरीब वर्गांत लोकप्रिय होत्या, तसे बेनझीर यांच्याबाबत म्हणता येणार नाही. त्या अत्यंत आग्रही होत्या; परंतु इंदिराजींचा धोरणीपणा व प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याची हातोटी आणि राजकीय शहाणपण त्यांच्याकडे फारसे नव्हते. एक महिला देशाचे नेतृत्व करीत आहे व त्यात ती सिंधी अस्मितेचा पुरस्कार करणारी! पुन्हा विदेशात शिकलेली आणि झुल्फिकार अलींची कन्या. पाकमधल्या तालिबानी व इतर जहालांना हे कसे रूचावे? लष्करात पंजाबांचे वर्चस्व असून, तेथे आजही झिया-उल-हकवादी प्रवृत्ती सक्रिय आहेत. भुत्तोंना फाशीतून माफी द्यावी, असे जगातील अनेक नेत्यांनी


स्थापण्या
समता शांती
टेवुनी शुद्ध
साधनां।
करिती साधना
त्यांना टेवो
उत्स्फूर्त
साधना



५ जानेवारी २००८
वर्ष ६० / अंक २०

● संपादक :
नरेंद्र दाभोलकर

● युवा संपादक :
विनोद शिरसाट

● हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४ येथे छापून,
**साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.

● दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
E-mail : ssadhana@vsnl.net साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५ / ४१.

● वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ३००/-, संस्थांसाठी रु. ४००/-

● [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]

● मुखपृष्ठ : शेखर गोडबोले : Mob. 9822503398

आणलेले दडपण झुगारून, झिया यांनी त्यांना रातोरात फासावर चढवले होते. माफी मिळाली असती, तर त्यांना आश्रय देण्याची तयारी तुर्कस्तानने दाखवली होती. झुल्फिकार अलींचे जिवंत राहणे झिया यांना धोकादायक वाटले. हुकुमशहा हा मनातून सदैव भीतिग्रस्त असतो. त्यामुळे त्यांनी भुत्तोंना संपवले. 'मला फाशी दिले तर मी हुतात्मा होईन', असे उद्गार भुत्तोंनी काढले होते. परंतु तसे काही घडले नाही. पुढे पाकिस्तान पीपल्स पार्टीने सत्ता मिळवली; परंतु भुत्तो हे पं.नेहरूंप्रमाणे कधीच देशाचे लाडके नेते नव्हते. पं.नेहरूंशी त्यांची तुलनाही होऊ शकणार नाही. नेहरू शांततावादी, तर भुत्तो अशांततावादी. नेहरू लोकशाहीप्रेमी, तर भुत्तोंनी अवामी पक्षाला बहुमत मिळाले, तरीही त्यांच्या हाती सत्ता न देण्याचे धोरण स्वीकारले, त्यामधूनच बांगलादेशची निर्मिती झाली. एअरमार्शल अशगर खान यांचे घर जाळणे, वलीखानांविरुद्ध कट रचणे आणि इतर काहीजणांचे खून पाडणे, ही कृत्ये भुत्तोंनी केली. बेनझीर यांनी हे प्रकार कधी केले नाहीत. परंतु झुल्फिकार अलींनी प्रचंड संपत्ती साठवली. कस्टम्स ड्यूटी न भरता मालाची आयात केली. पैशांचा अपहार केला. तुफानी भ्रष्टाचार केला. बेनझीर यांनी पित्याचा हा गुण मात्र अवश्य घेतला होता.

झुल्फिकार अलींनी सत्तेवर असताना शरीफ कुटुंबासह इतर उद्योगपतींच्या हितसंबंधांना हादरा दिला होता. त्यांनी काही उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले होते. तेव्हा जगभरच समाजवादाचे आकर्षण होते व भारतामध्येही इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते. बेनझीर यांच्या पित्याचे अनेक शत्रू होते. त्या राजकारणात आल्या, तेव्हा लष्कर व आय.एस.आय.ने त्यांना कधीच 'आपले' मानले नाही. त्यामुळे त्या सत्तेवर फार काळ टिकू शकल्या नाहीत. गेली ११ वर्षे त्या सत्तेबाहेर व मुख्यतः देशाबाहेर होत्या. तरीही त्यांच्या भोवतीचे वलय कमी झाले नव्हते. मात्र गेले काही महिने त्या झपाट्याने अमेरिकेच्या जवळ आल्या होत्या. बुश-बेनझीर मैत्रीमुळे जहाल वृत्ती पिसाळल्या. त्यात बेनझीरचा जनाधार वाढत होता. त्यामुळे बुश यांची दक्षिण आशियामधील व्यूहनीती यशस्वी होईल, अशी धास्ती त्यांना वाटू लागली. या पार्श्वभूमीवर, ज्या सौदी अरेबियाने नवाझ शरीफना आश्रय दिला होता, त्यांनीच त्यांची रवानगी पाकमध्ये करून टाकली! कारण अमेरिकाद्वेष हा इस्लामी राजनीतीचा गाभा आहे. त्यामुळे अमेरिकेशी दोस्ती करणाऱ्या स्त्रीपेक्षा, शरीफ यांच्यासारखा नेता परवडला, असा हिशेब इस्लामी देशांतील कट्टरपंथीयांनी घेतला. शरीफनी लाहोरमध्ये भारताशी मैत्री-करार केला असला, तरी मूलतत्त्ववाद्यांबद्दल त्यांना आत्मीयता होती व आहे. बेनझीरप्रमाणे त्यांनी जहालांना नेस्तनाबूत करण्याच्या गर्जना ठोकलेल्या नाहीत. शरीफ पंतप्रधान असताना त्यांनी मुशर्रफ यांचा 'गेम' करण्याचे ठरवले होते; परंतु मुशर्रफ यांनी बंड करून सत्ता मिळवली व शरीफना परागंदा व्हावे लागले. मुशर्रफ हेच कारगिलला जबाबदार होते; पण शरीफ यांना या घुसखोरीची माहितीच नव्हती, यावर विश्वास कसा ठेवावा?

बेनझीर, शरीफ व मुशर्रफ हे भारताचे मित्र कधीच नव्हते. मात्र ९/११ नंतर जगातले संदर्भ बदलले. अफगाणिस्तान व इराकमध्ये अमेरिकापुरस्कृत लोकशाही आली. त्याचप्रमाणे पाकिस्तानातही लष्करशाही खतम होऊन बुश-कोंडालिसा राइस यांनी ठरविलेल्या आराखड्यानुसार निवडणुका व्हाव्यात व लोकशाही यावी, अशी योजना होती. खुद्द मुशर्रफ अमेरिकेच्या तालावर नाचायला लागल्यापासून अतिरेक्यांचे लक्ष्य बनलेले आहेत. शरीफ यांच्या सभेजवळही भीषण गोळीबाराची घटना घडली असून, त्यांना सूचक इशारा देण्यात आला आहे. या स्थितीत शरीफ यांनीही निवडणुकीवर बहिष्कार टाकलेला आहे. पाकिस्तान पीपल्स पार्टी नेतृत्वहीन आहे. मुशर्रफ यांना भारताशी संबंध, काश्मीर, युनो, निवडणुका यांपैकी कोणत्याही विषयांत आता रस उरलेला नसावा. त्यांना फक्त स्वतःच्या जिवाचा घोर लागला आहे! 'दहशतगर्दी को खतम करने बगैर हम चैन से सो नहीं सकेंगे' अशी घोषणा करतानाही त्यांचा चेहरा भयग्रस्त दिसत होता. दिवसेंदिवस त्यांना झोप मिळत नाही, असे वाटते.

थोडक्यात पाकिस्तानातील लष्करशाही व लोकशाही दोन्ही धोक्यात आहेत. अफगाणिस्तान व इराकमध्ये कट्टरपंथीयांनी अमेरिकन सैनिकांना सळो की पळो करून सोडले आहे. पाकिस्तानात वायव्य सरहद्द प्रांत व बलुचिस्तानात सरकारचे फारसे काही चालत नाही. इस्लामाबाद, रावळपिंडी, कराची सर्वत्र हिंसाचाराचे थैमान सुरू असते. लष्करी अधिकाऱ्यांवरच हल्ले केले जात आहेत. मुशर्रफना मारण्याचे कैक प्रयत्न झाले. पाकमधील बेनझीर व शरीफ यांच्या पक्षातील वैमनस्य तूर्तास कमी होण्याची शक्यता आहे. मात्र या दोघांचे पक्ष फोडून पाकिस्तान मुस्लिम लीग (कायदे-आझम-क्यू)ची स्थापना झाली आहे. काहीही करून निवडणुका जिंकणे हे या जहाल पक्षाचे धोरण आहे. मुशर्रफ यांच्या आशीर्वादानेच यांपैकी काही गोष्टी घडलेल्या आहेत. बेनझीर यांना सुरक्षा देण्यात त्यांचे प्रशासन कमी पडले; पण या नेत्यांनीही थोडी काळजी घेणे इष्ट ठरले असते. मुजीबूर रहमान, प्रेमदास, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांची हत्या झाली. लोकप्रिय नेत्याला जगण्याचा अधिकारच नाकारला जावा, हे क्लेशदायक आहे. बेनझीर जगल्या असत्या व सत्तेत येत्या, तर त्या व सोनिया गांधी यांनी कदाचित दक्षिण आशियात नवा इतिहास लिहिला असता. परंतु ते होणे नव्हते. पाकच्या इतिहासाची पाने अजूनही रक्तरंजितच आहेत... ■

website : www.sadhanatrust.com

## कैफियत

### राजन गवस

# आता, पहिल्यासारख्या समंजस राहिल्या नाहीत चिमण्या!

‘चिमणी चिमणी पाणी दे ऽऽ, कावळ्या कावळ्याऽऽ ऊब देऽऽ’ म्हणत कोळशानं घासलेली पाटी हातात हालवत वाळवायचो. चिमणी पाणी द्यायची, कावळा ऊब द्यायचा आणि हळू-हळू अक्षरांशी मैत्री जमायची. सकाळी शाळेला चाललो की गल्लीभर चिमण्या रस्त्यातल्या धुळीत काय काय वेचत बसलेल्या दिसायच्या. त्यांची क्षणात खालीवर होणारी चोच, लुकलुकणारे डोळे, लुटू-लुटू हलणारी शेपूट, भुरळ घालणारे त्यांचे वावरणे! जवळ गेलं की भुर्रऽऽकन उडून जायच्या चिमण्या. त्यांना भीती वाटत नसायची माणसांची. भुर्रऽऽकन उडताना हवेतली आवर्तनं त्यांनाच भुरळ घालायची. मग ‘चिवऽऽ चिवऽऽ’चा गल्ली भरून उरणारा आवाज.

आमची शाळा गावाच्या तळ्याजवळ, किर्रऽऽ झाडीत. आठ खोल्यांची सुंदर इमारत. लांबच्या लांब व्हरांडा. सागवानी छप्पर. सगळ्या शाळेच्या व्हरांड्याभर चिमण्यांची घरटी. मधेच एखाद्या घरट्यातून नुकतंच जन्मलेलं (अंड्यातून बाहेर आलेलं) पिल्लू व्हरांड्यात पडायचं. त्याच्या भोवती आम्ही सगळी मुलं गोळा व्हायचो. डोळेही उघडलेले नसायचे त्याने. लालबुंद मांसाचा इवलासा गोळा. गलका बघून गुरूजी यायचे. मुलांना दटावून इकडं-तिकडं पहायचे. चिमण्यांची नजर चुकवून पिलाला अलगद घरट्यात ठेवायचे... आणि आम्हाला सांगायचे ‘पिलाला शिवाशिव केली तर चिमण्या त्याला बोचकारून मारतात.’

घरात आलं की आईला आम्ही विचारायचो, ‘आई माणसानं शिवाशिव केल्यावर चिमण्या पिलांना बोचकारून का मारतात?’ आई तिला सुचेल ते उत्तर द्यायची. तांदूळ निवडायला आई बसली की, चिमण्या तिच्या भोवतीच वावरायच्या. सुपात उरलेलं मातेरं आई चिमण्यांना खाऊ घालायची. म्हणायची, ‘चिमण्यांत परमेश्वर असतो.’ तिचं हे बोलणं मात्र काही कळायचं नाही. ती



चिमण्यांशी बोलायची. खूपखूप, कायकाय सांगायची. चिमण्या तिच्याशी बिनधास्त वागायच्या. तिच्याच अंगाखांद्यावर खेळायच्या. तिची शिवाशिव चिमण्यांना कशी काय चालायची, कुणास ठाऊक?

जोंधळ्याच्या कणसात दाणे भरू लागले की, घरातली माणसं आम्हांला शेताकडं तिरपटायचे. सकाळी-सकाळी बखोटीला पुस्तक मारून आम्ही शेतात जायचो. कणसांनी वाकलेलं जोंधळ्याचं शेत बघणंही खूप सैरभैर करणारं असायचं. शेताच्या मध्यभागी घातलेल्या माचावर उभं राहून फक्त हाकारा घातला, तरी शंभरभर चिमण्या भुर्रऽऽकन उडायच्या, या कोपऱ्यातून त्या कोपऱ्यात. मग गोफण फिरवून नेम धरून दगड मारला की, त्या पुन्हा जागा बदलायच्या. चिमण्यांच्या बरोबरच इतर पक्षी कधी कधी यायचे. पोपट थव्यानं जोंधळ्यात आले की कणसं पोपटी होऊन जायची. सगळं शेतच पोपटांनी झाकल्यागत वाटायचं. मग प्रचंड धावाधाव. दगड मारणं. डबा बडवणं. सगळं चाललं तरी त्याला कोणीच दाद द्यायचं नाही. चिमण्या तर आमची सत्त्वपरीक्षाच बघायच्या. रडकुंडीला आणायच्या. कितीही हाकलल्या तरी फिरून कणसावर. मग वडलांचे रागावणे.

यावर उपाय म्हणून आम्ही कावळा मारून आणून उंच काठीला टांगून जोंधळ्यात मध्यभागी लटकवायचो. चिमण्या ह्या मेलेल्या कावळ्याला खूप घाबरायच्या, पण तेवढ्यापुरत्याच. नंतर त्या सरावायच्या. मग भलं मोठं बुजगावणं उभं करायचो. एक दोन दिवस त्याला चिमण्या घाबरायच्या. पुन्हा त्याच्या टाळक्यावर बिनधास्त वावरायच्या. त्यांच्या त्रासानं जीव नकोसा व्हायचा. आणलेलं पुस्तक उघडूही द्यायच्या नाहीत चिमण्या.

चिमण्यांचं आणि आमच्या अभ्यासाचं जरा वाकडंच असायचं. अगदी शेवटपर्यंत. कॉलेजात आम्ही शेवटच्या वर्षाला. केसरकर नावाचे प्राध्यापक आम्हाला इंग्रजी शिकवायचे. लालबुंद चेहऱ्याचे. भुऱ्या केसाचे. आपले उच्चार थेट इंग्रजांसारखे करण्यावर त्यांचा भरपूर भर. तन्मयतेने शिकवायचे. वर्गात आले की दार बंद. कोणालाही नंतर प्रवेश नाही. एखाद्या शिपायानं नोटीस घेऊन दार उघडलं, तर अधिक लालबुंद व्हायचे. फड्याच्या बोंडासारखे. त्यांच्या तासाला टाचणी पडली तरी आवाज व्हायचा. त्यांचा तास हवाहवासा वाटायचा. असेच एकदा सर तन्मयतेने, भान विसरून शिकवत होते. अशात चिमण्यांची एक जोडी आली. बहुतेक दोघे पाठशिवणीचा खेळ खेळत असावेत. सगळ्या वर्गात चिवचिवाट.

सर शिकवायचे थांबले. त्यांनी खडू मोडून बारीक तुकडे केले. एक एक फेकून ते त्या जोडीला वर्गाबाहेर काढण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांना बधल्या तर त्या चिमण्या कसल्या? तो तास चिमण्यांना हाकलण्यातच संपला. सगळ्या पोरांनी वर्ग डोक्यावर घेतला. नंतर काही दिवस केसरकर सर वर्गात आले की, चिमण्या घुसल्याच. बिचारे सर कंटाळायचे. म्हणायचे, 'कुठल्या काळच्या वैरिणी माझ्या!' हळूहळू तेच बदलले. चिमण्यांच्या आवाजाची त्यांना सवय होऊन गेली.

कॉलेज संपल्यानंतर हळूहळू आम्ही सारेच पाखरासारखे भुर्रऽऽकन उडून गेलो. कोण कुठे, कोण कुठे. पोटासाठी दाही दिशा. कधीतरी सणावाराला गावची फेरी. तीही घाईघाईतच. कोण भेटलं, कोण नाही अशा स्थितीतच परतायचं. कधी रात्री पोहचलं की उजाडायच्या आधी गावातून बाहेर पडायचं. गावाची शीव बदलल्याचं जाणवायचं. तिट्यावर आता पानपट्टीचं दुकान. चहाचं हॉटेल. बरचं काय काय गावात नवं येत आहे. याचा सासुल लागायचा.

परवा सुट्टी काढून घराकडं गेलो होतो. आई तांदूळ निवडत बसलेली. आता खूप थकलेली. तिच्या समोरच टेकलो. ती कायकाय सांगत होती. मन लावून ऐकत होतो. एकदम मला जाणवलं, आई तांदूळ निवडतेय. पण आजूबाजूला एकही चिमणी नाही. आईला तसं म्हटलं तर ती सांगायला लागली, ''आता पयल्यागत न्हाई ऱ्हायल्या चिमण्या. कुठं दिक्कोपाल झाल्या.'' उगाचच काहीतरी हरवल्यासारखं वाटायला लागलं. गल्लीत आलो तर औषधालाही चिमणी नाही. मन उगचच भिरभिरायला लागलं. आईला सांगून तडक बाहेर पडलो. तळ्याजवळच्या शाळेजवळ पोहोचलो. शाळेजवळची सगळी झाडं तोडलेली. उजाड शाळा. लांबलचक व्हरांड्यातून फिरताना चिमण्यांची घरटी शोधू लागलो. कुठंच घरटं नाही. चिमण्यांचं झालं काय? या प्रश्नानं मला पोखरायला सुरुवात केली. गल्लीतून परतताना लहानपणीचा सवंगडी भेटला. उत्तम बागायती शेती करतो तो सध्या. त्याला विचारलं, 'अरे, चिमण्या गेल्या कुठं सगळ्या?' त्याला काहीच कळेना. मग समजून सांगितलं, तर म्हणाला, ''कशाला गाऽ ऱ्हातील त्या गावात? आता कोणी चिमण्यांना पसा मूठ सांडत नाही. त्यांनी शेतात जावं तर सगळ्या पिकांवर नाना औषधं फवारलेली. पिकावर रोग पडला – औषध. तण वाढलं – औषध. आता श्यात म्हणजे औषधाच्या बाटल्या, तिथं जगतील कशा चिमण्या?'' त्याच्या उलट्या प्रश्नानं भांबावलो. आम्ही प्रगती करायला निघालेले लोक, कोणत्या वाळवंटाच्या निर्मितीत गुंतलोय? कशासाठी? मित्राच्या बोलण्यानं डोक्यात नवंच कायकाय सुरू झालेलं.

संध्याकाळी भाऊ शेतावरून आला. त्याचं सुरू होतं 'आता गव्हाला पाणी पाजलं पाहिजे. लागवड टाकली पाहिजे.' असं बरचं काही. त्याला थांबवून म्हटलं. 'अरे, जुंधळ्यावर पाखरं बसतात आता?' तो चक्रावलाच. माझ्याकडं टाळा पगळून बघायला लागला. म्हणाला, 'आता पहिल्या सारख्या समंजस राहिल्या नाहीत चिमण्या. एकदम कावदारून येत्यात शेतात, हल्ला केल्यासारख्या.'

आई मधेच तोंड घालत म्हणाली, ''येणारंच, त्यास्नी कुठं जगायला जागा ठेवलीया कुणी?''

आईचं म्हणणंच बरोबर होतं. चिमण्यांना जगायला जागाच ठेवली नाही शिल्लक. रासायनिक खतांचा मारा. निरनिराळ्या कीटकनाशकांचा मारा. त्यात भरीला भर म्हणजे आजूबाजूला झाडं शिल्लक उरणार नाहीत याची घेतलेली खबरदारी. चिमण्यांनी घरटं बांधायचं तरी कुठं?

एकदम उदास वाटायला लागलं. माझ्या मुलाला पाटी कोळशानं घासून 'चिमणी चिमणीऽऽ पाणी देऽऽ' म्हणता आलं नाही. पण त्यानं चिमणी बघितली. पण त्याच्या मुलाला चिमण्या चित्रात तरी दाखवता येतील का? या प्रश्नानं माझं डोकं गरगरू लागलं. आणि एक टाक पुटपुटू लागलो :

'चिमणीऽऽ चिमणीऽऽ पाणी देऽऽ!'

**राजन गवस**
मु.पो. गारगोटी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
मोबाईल : ९४२२५८०५१७.

■

[रेखाचित्रे : हृषिकेश जोशी - ९३७३१४२२९६]



**कुळागर**

**सुभाष भेण्डे**

**‘कुळागर’ हा निसर्गसमृद्ध गोमंतकाचा वैशिष्ट्यपूर्ण भाग. खेडोपाडी वर्षातील बारा महिने कुळागर डवरलेलं असतं. माड, पोफळी, केळ, पानवेल, मिरवेल, निरफणस, जांभूळ, पारिजात अशी वैचित्र्यपूर्ण झाडं सदैव बहरलेली असतात.**

**‘कुळागर’ या सदरात सुभाष भेण्डे, ‘साहित्य-संस्कृती’ निर्मितीचं वैशिष्ट्यपूर्ण दर्शन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ‘साधना’तून घडविणार आहेत.**

# अलौकिक चिकित्सक

नुकतेच कालवश झालेले मराठीतील थोर समीक्षक प्रा. म. वा. धोंड यांच्या समीक्षेची जात फार वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. सूक्ष्म संशोधनदृष्टी आणि संवेदनक्षम सौंदर्यदृष्टी यांचा प्रगल्भ संगम त्यांच्या समीक्षेत आढळून येतो. वाचन अफाट आणि स्मरणशक्ती अचाट. संशोधकाला आवश्यक असते – जिज्ञासावृत्ती आणि कल्पनाशक्ती; तर्कबुद्धी आणि सारासार विवेक. शिवाय एखाद्या विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी चिकाटीही हवीच. या सर्व घटकांचा समुच्चय प्रा. धोंड यांच्या व्यक्तिमत्वात झालेला होता. एखादा प्रश्न पडल्यावर त्याचे समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत त्यांना चैन पडत नसे.



विविध विषयांत त्यांना रस होता. नाटके, चित्रपट, संगीत, तमाशा, ललित साहित्य, शेअर मार्केट अशा बहुविध गोष्टींत तळापर्यंत जाण्याची त्यांची वृत्ती होती. प्रचंड व्यासंगाच्या परिणामी त्यांची लेखणी विद्वज्जड झाली नाही. लेखनशैली कधी गंभीर, कधी मिस्कील, कधी उपरोधपूर्ण तर कधी वाह्यात देखील (त्यांच्या वाह्यात लेखनाचे अस्सल नमुने पहावयाचे असतील तर जिज्ञासूंनी ‘स्वामी’ आणि ‘रघुनाथाची बखर’ या कादंबऱ्यांचा त्यांनी घेतलेला परामर्श एकदा डोळ्यांखालून घालावा!) ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, मर्ढेकरांची कविता यांची नित्य पारायणे चालू असत. पाठांतर जबरदस्त. संतवाङ्मयामधील संदर्भ जिभेच्या टोकावर. एखादा निसटता संदर्भ तर तपासून पाहण्यासाठी ते ग्रंथालयात तासन्‌तास घालवीत. पुस्तकांचा ढीग त्यांच्या भोवती असे. मराठीप्रमाणेच इंग्रजी पुस्तके ते झपाट्याने वाचून काढत. समाधान होईपर्यंत महिनोन् महिने ते धांडोळा घेत. त्याबाबतीत त्यांनी कधी आळस केला नाही.

उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट होईल.

‘पै’ हींवराची दाट साउली। सज्जनी जैसी वालिली।
तैसिं पुण्यें डावलूनी गेलीं। अभक्तांतें॥’

या ज्ञानेश्वरीतील ओवीने त्यांना अडवले. ओवीचा उत्तरार्ध सहज कळला, पण पूर्वार्ध नीट उमजेना. हिवराची सावली चांगली दाट असूनही सज्जन ती टाळतात, त्याअर्थी त्यात दुर्जनाकरिता काहीतरी ‘गंमत’ (हा प्रा.धोंडांचाच शब्द) नक्कीच असली पाहिजे. ती कोणती?

धोंडांना चुटपुट लागून राहिली. हिवर पूर्ण अपरिचित, म्हणून शब्दकोश व ज्ञानेश्वरीचे निघंटू पाहिले. शिवाजीराव भावे यांचा ‘ज्ञानेश्वरी कोश’ न्याहाळला. समाधान होईना. मग ते वनस्पतिशास्त्राच्या प्राध्यापकांना भेटले. (प्रा.धोंड म्हणतात, ‘ते तर बिचारे माझ्याहूनही निष्पाप! त्यांना हिवराची सावली टाळायची असते, हे तर ठाऊक नव्हतेच, पण हिवरही ठाऊक नव्हता.’) ग्रंथालयांतील संदर्भग्रंथ धुंडाळल्यावर हिवर व बाभूळ एकाच कुळातील झाडे आहेत एवढे ज्ञान झाले. हिवराची सर्व लक्षणे हळूहळू कळू लागली. प्रत्येक झाडाची पाने, फुले, फळे, शेंगा, डहाळ्या, फांद्या, खोड, विस्तार यांकडे लक्षपूर्वक पाहण्याचे वेडच लागले. (या काळात प्रा.धोंड आमच्या ‘साहित्य सहवास’मध्ये लावलेल्या असंख्य झाडांकडे तासन्‌तास टक लावून पहात उभे असल्याचे दृश्य सर्व रहिवाशांना दिसत असे.) पुढे नागपूर विद्यापीठात ते काही कामाकरिता गेले असता १८ वर्षे वयाच्या एका मुलाने हिवराचे झाड त्यांना दाखवले. ‘अॅकॅशिया ल्यूकोफ्लॉइआ’ हे हिवराचे लॅटिन नाव असल्याचे त्यांना समजले. हिवर भेटला, पण त्याच्या सावलीला सज्जन का बसत नाहीत, हे कळले नाही. पुन्हा एकदा ते ग्रंथाला शरण गेले. जॉर्ज वॅटचा ‘डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक प्रॉडक्ट्स ऑफ इंडिया’ हा बृहद् ग्रंथ पाहत असताना ‘हिवराची साल दारूकरता तयार केलेल्या रसायनात घातली तर ते लवकर फसफसते, त्यातील गाळ खाली बसतो आणि त्याला चांगला स्वाद येतो आणि म्हणून हिवराला ‘शराब की कीकर’ असेही नाव आहे’, हे

कळून आले. आणि 'सज्जन' हिवराच्या सावलीला का बसत नाहीत याचा तात्काळ उलगडा आला.

तरीपण एक 'उडाणटप्पू' प्रश्न विनाकारण सतावू लागला. हे ज्ञानदेवकालीन ज्ञान आजच्या हातभट्टीवाल्यांपर्यंत पोचले असेल का? प्रा.धोंड लिहितात, 'हातभट्ट्या कुठे लागत हे पोलिसांखेरीज बहुतेकांना ठाऊक होते. मलाही रात्रीच्या वेळी त्या दिसत असत; पण तिथे जाणे धोक्याचे होते.' अनेक वर्षे लोटली आणि एक दिवस लक्ष्मण माने यांचे त्यावेळी नुकतेच प्रकाशित झालेले 'उपरा' हे आत्मचरित्र वाचनात आले. त्यातील पुढील मजकुराने त्यांचे लक्ष वेधून घेतले. 'दारू गाळण्याकरिता नवसागर आन हिवराची साल, नासका गुळ येवढंच भांडवल...' हे वाचले आणि प्रा.धोंडांचा हिवराचा शोध संपन्न झाला. कैक शतके चालत आलेली मद्यनिर्मितीप्रक्रिया महाराष्ट्राने ज्ञानदेवोत्तर काळातही सात शतके टिकवून धरल्याचे त्यांच्या लक्षात आले! हिवराच्या निमित्ताने झाडांचे निरीक्षण करण्याची त्यांना सवय जडली आणि 'ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी' हा ज्ञानेश्वरीच्या वेगळ्या अंगाचे विवेचन करणारा अभिनव ग्रंथ आकाराला आला. ज्ञानदेव आपण घेतलेला गीतेचा अनुभव सर्वांसाठी, सभोवतालच्या लौकिक सृष्टीतल्या प्रतिमांद्वारे व्यक्त करतात. संदर्भसमृद्ध असलेल्या या लौकिक सृष्टीचा नेमका वेध प्रा.धोंड घेतात.

राम गणेश गडकरी यांच्या वाङ्मयाविषयी, विशेषतः त्यांच्या नाट्यलेखनासंबंधी, नवा विचार मांडणारे 'चंद्र चवथिचा' हे धोंडांचे पुस्तक गडकरी-समीक्षेत मोलाची भर घालते, यात शंका नाही. 'एकच प्याला' नाटकातील 'चंद्र चवथिचा' या गीतावर धोंडांनी जे भाष्य केले आहे, ते त्यांच्या अद्‌भुत संशोधन-पद्धतीवर चांगलाच प्रकाश टाकते. सिंधू दळणाच्या वेळी हे गीत गाते. गीत छोटे आहे :

'चंद्र चवथिचा।<br>
रामाच्या ग बागेमधे चाफा नवतीचा॥'

एवढेच. पाळण्यात मूल आहे आणि गर्भश्रीमंताची मुलगी सिंधू नवऱ्याच्या व्यसनामुळे विपन्नावस्था आल्याने उपाशीपाटी, फाटक्या लुगड्यात, मोलाचे दळण दळत आहे. तान्हे बाळ पोटभर दुधालाही महाग झाले आहे. अनेक वर्षे शोध घेतल्यानंतर धोंडांच्या लक्षात आले की हे पारंपरिक लोकगीत नाही. अस्सल लोकगीताचा बाज असलेला हा चरण स्वतः गडकऱ्यांनीच रचलेला आहे. 'चाफा' हे नवऱ्याचे प्रतीक. स्त्रियांच्या भावजीवनात चंद्र आणि चौथ यांना काही वेगळे संदर्भ आहेत. पहिले पंधरा दिवस कलेकलेने वृद्धी पावणारा आणि पुढील पंधरा दिवस कलेकलेने क्षीण होणारा चंद्र आणि मासिकपाळीने नियंत्रित होणारा स्त्रियांचा कामविकार यात काही साम्य आहे, असे प्रा.धोंड यांचे म्हणणे. चतुर्थ दिवस स्त्रीच्या बाबतीत विशेष महत्त्वाचा. त्या विशिष्ट दिवशी सिंधूचा जीव मोहरून गेलेला आहे. सुधाकराचे ती चिंतन करते आहे. 'हा नवतीचा चाफा तिच्या सर्व अतृप्त इच्छा तृप्त करणार असतो – म्हणून तर तिला 'चंद्र चवथिचा' हे जुने गीत आठवते, असे प्रा.धोंड नमूद करतात. हा आगळावेगळा संशोधक जाणीवेत जे हाती लागते तेवढ्यावर थांबत नाही – अर्धस्फुट नेणीवेत तळापर्यंत जाण्याची त्याची जिद्द असते हेच खरे!

आपले संशोधन हा त्या विषयावरचा अखेरचा शब्द नव्हे, याची त्यांना जाणीव होती. किंबहुना वेळप्रसंगी आपण काढलेल्या निष्कर्षातील त्रुटी प्रा.धोंड स्वतःच शोधून काढत. मर्ढेकरांच्या 'पिंपात मेले ओल्या उंदीर' या गाजलेल्या कवितेचा त्यांनी ऑगस्ट १९६७ साली 'सत्यकथे'त लेख लिहून अर्थ लावला होता. 'दंभहारक' मासिकात १८७५ साली 'उंदरांचा उपद्रव आणि त्यांचा नाश करण्याचा उपाय' हा लेख प्रसिद्ध झाला होता. या लेखातील एका उताऱ्यामुळे मर्ढेकरांच्या प्रस्तुत कवितेतील प्रतिमेचा आशय स्पष्ट होतो, असे प्रा.धोंडांना वाटले. त्यानंतर जवळजवळ २७ वर्षांनी धोंडांनी 'पुन्हा एकदा पिंपात मेले' हा लेख लिहून आधी केलेले कवितेचे विश्लेषण चुकीचे असल्याचे मोकळेपणाने मान्य केले. उंदीर, ओली पिंपे या केवळ प्रतिमा आहेत हे त्यांनी अधोरेखित केले. कवितेच्या अंतरंगाला भिडण्यासाठी रॉबर्ट बर्न्सची 'टू अ माउस' ही कविता, स्टाइनबेकची 'ऑफ माउस ॲण्ड मेन' ही कादंबरी, 'रॅट-रेस' हा शब्दप्रयोग आणि 'बॅरल' व 'वेट' या इंग्रजी शब्दांचे लाक्षणिक अर्थ लक्षात घ्यावे लागतात यांवर त्यांनी भर दिला. अन्य समीक्षकांनी 'पिंपात मेले ओल्या उंदिर' कवितेचा अर्थ कसा चुकीचा लावलेला आहे, हे स्पष्ट करायला ते विसरले नाहीत!

गेली काही वर्षे त्यांना तुकाराम आणि मर्ढेकर या दोन महाकवींनी झपाटून टाकले होते. मर्ढेकरांच्या कवितांचा केवळ अन्वयार्थ लावून त्या कळत नाहीत, त्यांच्या कवितांच्या दोन ओळींदरम्यान दडलेला अर्थ शोधून काढावा लागतो, 'बिटवीन द लाईन्स' काय आहे हे धुंडाळावे लागते, यावर त्यांनी भर दिला. 'बन बांबूचे पिवळे गाते। आकाशातील अधोरेखिते।' सारख्या कविता. त्या कविता लिहिल्या गेल्या त्यावेळची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती समजून घेतल्याशिवाय कळणार नाहीत, असा त्यांचा दावा होता. राजकीय परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी ते आंतरराष्ट्रीय राजकारणाचाही वेध घेत. कवीच्या कौटुंबिक जीवनात काय घडत होते आणि त्या घटनांचे प्रतिबिंब कवितेत पडले आहे काय, याचा ते बारकाईने शोध घेत. मर्ढेकरांसारख्या संवेदनशील कवीच्या वैयक्तिक जीवनात निर्माण झालेल्या वादळाचे पडसाद त्यांच्या कवितेत उमटल्याशिवाय राहणार

नाहीत, असे गृहित धरून त्या अनुरोधाने त्यांच्या संशोधनाचा प्रवास चालू राहत असे.

निधनापूर्वी त्यांचे दोन लेख 'दीपावली' आणि 'ललित' दिवाळी अंकांत प्रसिद्ध झाले. पहिला लेख 'तुकोबांचे निर्याण' या विषयावरचा. वयाच्या अवघ्या बेचाळिसाव्या वर्षी तुकोबांचे निधन झाले. त्यांचे निर्याण कसे झाले, याविषयी संशोधकांत तीव्र मतभेद आहेत. ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रचारकांनी त्यांचा खून झाला आणि ते नीच कृत्य देहूच्या ब्राह्मणांनी केले असे म्हटले आहे, तर तुकोबांच्या वंशजांनी ते 'सदेह वैकुंठाला गेल्याचा' दावा केला आहे. ('प्रभात'च्या 'संत तुकाराम' चित्रपटात सदेह वैकुंठगमनाचे मनोरम दृश्य आवर्जून दाखवण्यात आले होते!) प्रा.धोंड यांनी हे दोन्ही निष्कर्ष नाकारून तुकोबा देहूहून पंढरीला गेले आणि माऊलीची अखेरची भेट घेऊन परागंदा झाले, असे मत पुरावे देऊन व्यक्त केले आहे.

'ललित'मधला लेख "कुठली सीता कुठला राघव! आणि कुठले रामराज्य!" या दीर्घ शीर्षकाचा आहे. मर्ढेकरांच्या 'खप्पड बसली फिक्कट गाल' या झोपडपट्टीवरच्या कवितेचा संदर्भ घेऊन १९४८ साली म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वर्षभरात लिहिलेल्या या कवितेचा संबंध धोंडांनी आजच्या काळाशी जोडला आहे. 'स्वराज्य म्हणजे रामराज्य' ही महात्मा गांधींची घोषणा. आज स्वराज्य मिळून ६० वर्षे झाली. पण जिथे राज्याधिकारी, कारभारी, बिल्डर भ्रष्टाचारास प्रवृत्त होतात तिथे कुठली सीता, कुठला राघव नि कुठले रामराज्य! मर्ढेकरांसारखा कवी द्रष्टा असतो, दिक्कालांतुनि आरपार पाहू शकतो, हे प्रा.धोंड यांनी अधोरेखित केले आहे.

त्यांचे काम अखेरचा श्वास घेईपर्यंत चालू होते. ही चिकित्सक धडपड आणि दुर्मिळ अस्वस्थपणा त्यांच्या जाण्याने संपला...

**— सुभाष भेण्डे**
५, ज्ञानदेवी, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
दूरध्वनी : (०२२) २६५९१६०३.

■

**साधना वर्गणीदारांसाठी सूचना :**

साधना साप्ताहिकाचे अंक अत्यंत नियमितपणे, दर गुरुवारी पुणे पोस्टात पोचवले जातात.
तरीही, गेल्या काही महिन्यांत, अंक न मिळाल्याबाबत येणाऱ्या तक्रारी वाढल्या आहेत.
याबाबत आम्ही पुढील विनंती करत आहोत –

१] अंक मंगळवारपर्यंत न मिळाल्यास, साधना कार्यालयात फोन करावा. (श्री. खेडेकर : ०२०-२४४५१७२४) अंक शिल्लक असल्यास त्वरित पाठवला जाईल.

२] वारंवार असे घडू लागल्यास, स्थानिक पोस्टात लेखी तक्रार द्यावी. त्याची प्रत साधना कार्यालयात पाठवावी. आम्ही त्याचा पाठपुरावा करू.

३] 'साधना'चे सर्व अंक आता www.sadhanatrust.com या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. त्यामुळेही गैरसोय कमी होईल.

४] आपल्या वर्गणीचे नूतनीकरण वेळच्या वेळी होत आहे ना, याकडे कृपया लक्ष द्यावे.

**— व्यवस्थापक, साधना.**

अशोक राजवाडे

# जागतिकीकरण : भांडवलाचं आणि सामान्य माणसांचं

या अंकापासून ‘कुंपणापलीकडे’ या नावाने सदर सुरू करीत आहे.

समाजाचा कार्यक्रम सामाजिक शक्तींनी ठरवावा की बाजाराने, हा आजच्या घडीला सर्वांत मोठा वादाचा विषय आहे. जागतिकीकरणाबद्दल आज आणि गेली काही वर्षे बरीच चर्चा चालू आहे. विशेषत: त्यात अंतर्भूत असलेल्या खुल्या बाजाराच्या संकल्पनेबद्दल बरेच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कारण आजच्या जागतिकीकरणाचा कार्यक्रम मुक्त बाजाराच्या अनुषंगाने चालू आहे आणि ही कल्पना उचलून धरणाऱ्या शक्ती याबद्दल आग्रही आहेत. मुक्त बाजार ही कल्पना भांडवलशाहीच्या चौकटीतली असून ती एक बंदिस्त विचारप्रणाली आहे आणि त्याच्याविरुद्ध असणाऱ्यांविषयी तिच्या पुरस्कर्त्यांनी अत्यंत कर्मठ भूमिका घेऊन अनेकदा हिंसक कृत्यं करण्यापर्यंत मजल गाठली आहे. (उदा. १९७३ साली चिलीत लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेलं सरकार उलथून टाकलं गेलं. आयंदे सरकारने ज्या उद्योगांचं राष्ट्रीयीकरण केलं होतं ते पुन्हा खाजगी हातात सोपवण्यात आले. अमेरिकेच्या शिकागो विद्यापीठात मुक्त बाजाराचे प्रणेते अर्थतज्ज्ञ मिल्टन फ्रीडमन होते. त्यांच्या शिष्यांनी हे सारं घडवण्यात पुढाकार घेतला होता. नंतर फ्रीडमननी याबद्दल चिलीचा हुकूमशहा ऑगस्टो पिनोशे याची पाठ थोपटली होती.) माणसावर लक्ष देण्याऐवजी प्रगत देशांत साचलेल्या भांडवलाला सारे दरवाजे खुले करणं आणि सारे अडथळे मोडून काढणं हे लक्ष्य समोर होतं. सार्वजनिक वा सामायिक क्षेत्रात असणाऱ्या विविध संसाधनांवर, शासनांवर वा संस्थांवर हल्ला चढवून ते ताब्यात घेणं हा यातला महत्त्वाचा कार्यक्रम आहे. भारतात आजही हा कार्यक्रम जोरात राबवला जात आहे. यात शिक्षण, आरोग्य यांसह विविध सेवांचा समावेश आहे आणि आपण सारे याची मोठी किंमत मोजतो आहोत. सार्वजनिक क्षेत्रातल्या सेवा मोडीत काढून त्या भंगाराच्या किंमतीत उद्योजकांना विकणं यालाच आपण ‘सुधारणा’ म्हणू लागलो आहोत. भाषेतला हा फरक लक्षात घेण्यासारखा आहे.

सेझसारखे कार्यक्रम अत्यंत वेगाने घेतले जात आहेत आणि गोरगरिबांची बाजू घेणारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षही या रसातळाशी जाण्याच्या स्पर्धेत आक्रमकपणे भाग घेत आहे. वंचितांच्यासाठी लढे देण्याऐवजी ‘कोणतीही किंमत मोजून प्रगती’चा मार्ग चोखाळला जात आहे. यासाठी टाटाच काय तर इंडोनेशियातल्या सलीम समूहाचीही मनधरणी केली जात आहे. सलीम समूहाची इंडोनेशियातल्या एकेकाळच्या सुहार्तो राजवटीशी असलेली मैत्री जगजाहीर आहे. (सुहार्तो राजवटीत सहा लाख कम्युनिस्टांची कत्तल झाली होती.)

**मुक्त बाजारावर आधारित जागतिकीकरण, त्याचं स्वरूप, त्याचा प्रसार करणाऱ्या संस्था, अमेरिकेच्या अर्थकारणाचा त्यातील सहभाग, या साऱ्यात गृहीत असलेलं लष्करीकरण या स्वरूपाच्या जागतिकीकरणाला होणारा विरोध हे विषय या सदरात प्रामुख्याने येतील. कारण यातली प्रत्येक गोष्ट आपल्यावर परिणाम करते आहे. खेडेगावातल्या शेतकऱ्याला बी-बियाणं, खतं कोणत्या दरात मिळतील, त्याचा माल बाजारात खपेल की नाही; त्याला आपली कर्ज भागवता येतील की नाही; कामगारांना युनियन स्थापन करता येतील की नाही हे सारं बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार ठरत आहे. पूर्वीप्रमाणे आता कामाचे ठराविक तास राहिले नाहीत. तुमच्या मुलांना आता नोकरीत दहा-बारा तास काम करायला सांगितलं जात आहे. हे पाहून पुन्हा एकदा आपण एकोणीसाव्या शतकातल्या नव-औद्योगिकीकरणाच्या गुलामगिरीसदृश काळाकडे वाटचाल करीत आहोत की काय असं वाटू लागतं.**

आपले समुद्रकिनारे, मोकळ्या फिरण्याच्या जागा, मैदानं ही सारी हळूहळू खाजगी क्षेत्रात गेली आहेत/जात आहेत. मुंबईतल्या नगरसेवकांनी संगनमत करून मोकळी मैदानं खाजगी क्लबना ‘चालवायला देण्याचा’ घाट नुकताच उघडकीला आला आहे. इतकंच काय तर, पोलीस चौक्यांवरही खाजगी कंपन्यांच्या ‘सौजन्या’चे फलक लागले आहेत.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि जागतिक व्यापार संघटना या संस्थांनी आपापले कार्यक्रम मुक्त बाजाराच्या अनुषंगानेच आखले असून सार्वजनिक क्षेत्रांचं खाजगीकरण करणं हा त्यांच्या कार्यातला महत्त्वाचा भाग आहे. (बेस्ट उपक्रम किंवा पश्चिम रेल्वे यांसारख्या उत्कृष्ट सार्वजनिक सेवा मुंबईत उपलब्ध

असूनही मुंबईची नवी मेट्रो सेवा (जी अधिक किफायतशीर असणार आहे) खाजगी-सार्वजनिक सहकार्याच्या तत्त्वावर चालणार आहे. याचा नेमका अर्थ जाणकार समजून असतात.)

खुद्द आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वा जागतिक बँक यांमध्ये त्यांच्या मतप्रणालीच्या विविध विवाद्य मुद्द्यांवर, तिच्यातल्या अधिकाऱ्यांनीसुद्धा टीका केली आहे.

१९९० मध्ये भारतामध्ये या कल्पनाप्रणालीचे पुरस्कर्ते अधिक प्रभावशाली झाले. या कालखंडात मुक्त बाजारप्रणालीचे अनेक खंदे समर्थक सत्तेवर होते. डॉ.मनमोहनसिंग, चिदंबरम आणि मॉंटेकसिंग अहलुवालिया यांची नावं या संदर्भात प्रामुख्याने घ्यावी लागतील. तसंच शरद पवार यांचाही उल्लेख करावा लागेल. यापैकी मनमोहनसिंग वगळता इतर तिघे, या ना त्या प्रकारे एन्रॉन प्रकरणात त्या कंपनीची बाजू घेत होते, हा योगायोग नव्हे. अमेरिकेत सिएटलला १९९९ साली जागतिक व्यापार संघटनेच्यासमोर निदर्शनं झाली, त्यामुळे या विचारसरणीच्या विरुद्ध असलेला असंतोष प्रथमच जगासमोर आला.

लॅटिन अमेरिकेतल्या देशांनी १९९८ नंतर या विचारसरणीला प्रखरपणे विरोध केलेला दिसतो. व्हेनेझुएला, बोलिव्हिया, इक्वाडोर, निकाराग्वा, या देशात डावी सरकारं सत्तेत असून, त्यांनी अमेरिकेविरुद्ध व्यापक आघाडी उघडली आहे. तसंच ब्राझील, चिली, अर्जेंटिना या देशांत जर काही अंशी डावेपणा असला तरी तो बराचसा दुर्बळ आहे. तरीपण या व्यापक आघाडीला काही प्रमाणात पाठिंबा आहे. मुख्य म्हणजे हे सारे प्रयत्न लोकशाही निवडणुकीच्या वा सार्वमताच्या मार्गाने होत असून त्या त्या देशातल्या लोकांचा एकूणच राजकीय प्रक्रियेमध्ये लक्षणीय सहभाग आहे. तसंच या साऱ्या राजकीय घडामोडींमध्ये हिंसाचार क्वचितच घडलेला आहे. मुख्य म्हणजे यातल्या नेत्यांनी हिंसाचाराला उत्तेजन दिल्याचं दिसत नाही. तरीपण राजकीय लढे सुरूच आहेत. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे जुन्या साम्यवादाच्या मॉडेलपेक्षा हे वेगळं आहे. क्यूबाचे नेते फिडेल कॅस्ट्रो यांच्याबरोबर लॅटिन अमेरिकेतल्या नव्या डाव्या नेत्यांचे संबंध मित्रत्वाचे असले तरी क्यूबाचे राजकीय प्रतिरूप यापैकी कोणी स्वीकारलेलं दिसत नाही. तरीपण क्यूबाने शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांत केलेलं काम अनेक देशांनी मॉडेल म्हणून स्वीकारलं आहे किंवा क्यूबाची मदत आपल्या देशातल्या सेवा विकसित करण्यासाठी घेतली आहे. बाजाराधिष्ठित विचार करणाऱ्यांचं लक्ष सतत भांडवलदार केंद्रित झालेलं आपल्याला दिसतं. यात तळच्या माणसाकडे दुर्लक्ष होताना दिसून येतं. त्याऐवजी भांडवलदारांना सोईस्कर धोरणं आखण्यावर त्यांचा भर असतो. करांमध्ये सवलती, भांडवल आणि बाजारावरील निर्बंध उठवणं, कामगारांना आणि त्यांच्यासंबंधी कायद्यांना खिळंखिळं वा निष्प्रभ करणं हे अशा विचारांचे आणि ते मानणाऱ्या राजवटींचे गुणविशेष नेहमी दिसून येतात. याउलट, लॅटिन अमेरिकेतल्या नव्या डाव्या नेत्यांनी तळातल्या माणसाकडे लक्ष केंद्रित केलं आहे. स्वस्त वा मोफत शिक्षण, स्वस्त वा मोफत आरोग्यसुविधा, स्त्रियांना प्राधान्य, प्रागतिक विचार, लोकशाही मूल्यांची जपणूक, विचारस्वातंत्र्य, दारिद्र्य उच्चाटणावर भर, कॉर्पोरेटऐवजी सहकारी पद्धतीला प्राधान्य हे सारे या विचारांत आणि कृतींत कमीजास्त प्रमाणात केंद्रस्थानी आहेत.

समाजाच्या विचारांमध्ये बाजाराला मध्यवर्ती स्थान असलं पाहिजे आणि त्याला अनुसरून बाकी सामाजिक राजकीय संस्था उभ्या राहिल्या पाहिजेत अशा स्वरूपाचा विचार मुक्त बाजारपेठवाले मानतात; तर समाजाच्या विचारांनुसार बाजाराने चाललं पाहिजे असा आग्रह याला विरोध करणारे मानतात. आजच्या घडीला जगात सर्वात वादाचा हाच मुद्दा आहे.

युरोपप्रमाणे लॅटिन अमेरिकेतल्या देशांमध्ये काही प्रमाणात एकत्रीकरणाची प्रक्रिया वेग धरत आहे. या देशांनी एकत्र येऊ दक्षिणेच्या देशांची एक बँक निर्माण करण्याचं ठरवलं आहे. १० डिसेंबरला ब्यूनोस आयर्सला व्हेनेझुएला, बोलिव्हिया, इक्वाडोर, अर्जेंटिना, ब्राझील, पॅराग्वे या सहा देशांनी ह्या बँक स्थापनेच्या करारावर सह्या केल्या. या बँकेचं स्वरूप वेगळं असून त्यात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी वा जागतिक बँक यांप्रमाणे आपली धोरणं कोणी सदस्य देशांवर लादणार नाही असं तिच्या पुरस्कर्त्यांचं म्हणणं आहे. यूरोप्रमाणे स्वतंत्र चलन निर्माण करणं आणि लॅटिन अमेरिकेतील देशांचं एकत्रीकरण घडवून आणणं यासाठी ही बँक हा एक महत्त्वाचा टप्पा असणार आहे. तसंच या देशांच्या राजवटी, तिथल्या जनतेचे लढे, संस्कृती या साऱ्यांना, अनुसरून स्वतंत्रपणे माध्यमं विकसित करण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. जुलै २००५ पासून व्हेनेझुएला, क्यूबा, अर्जेंटिना, उरूग्वे या देशांनी मिळून 'टेलेसूर' नावाची नवी दूरचित्रवाणी वाहिनी सुरू केली आहे. अर्जेंटिनाचे भूतपूर्व अध्यक्ष नेस्टर कर्चनर यांनी व्हेनेझुएलकडून आर्थिक साहाय्य घेऊन नाणेनिधीचं कर्ज वेळेआधीच भागवलं आहे. यामुळे सगळेच प्रश्न सुटले आहेत असं नव्हे, पण एकंदरीत, अमेरिकेच्या प्रभावातून बाहेर पडण्याचे या देशांचे सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत असं म्हणता येईल. अमेरिकेचं म्हणणं आता तिथे सहजासहजी कोणी ऐकून घेत नाही. इक्वाडोरमधला मान्ता नावाच्या ठिकाणी एक विमानतळ

**या सदरात विषय प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संदर्भातले असतील. सदराचं नाव 'कुंपणांपलीकडे' आहे. म्हणजे सर्व प्रकारची कुंपणं ओलांडून जाणं त्यात अभिप्रेत आहे. यात जाती, धर्म, देश आणि व्यक्तींच्या मनात असलेली अहंकारी कुंपणं या साऱ्यांचा समावेश असेल. मुख्य म्हणजे भांडवलाऐवजी मनुष्याला केंद्रस्थानी ठेवून नव्या जागतिकीकरणाची जी धडपड आता सुरू आहे त्याची दिशा या साऱ्यांतून सूचीत व्हावी असा प्रयत्न असेल. विज्ञान, राजकारण, कला, तंत्रज्ञान यांपैकी कोणतेच विषय इथे वर्ज्य नसतील. स्थानिक महत्त्वाचे प्रश्नही कधी यात येऊ शकतात.**

अमेरिकेच्या लष्कराने दहा वर्षांच्या कराराने वापरासाठी घेतला होता. त्याची मुदत २००९ साली संपते आहे. मात्र त्यानंतर हा तळ अमेरिकेला पुन्हा मिळण्याची शक्यता नाही. कारण आम्हाला (अमेरिकेतल्या) फ्लोरिडात हवाई तळ वापरायला मिळाला तरच आम्ही अमेरिकेला आमचा तळ वापरायला देऊ, असं इक्वाडोरचे डावे अध्यक्ष राफेल कोरिया यांनी अमेरिकेला सुनावलं आहे. इक्वाडोरसारख्या एका छोट्या देशाने अमेरिकेला असं सुनवावं यातून वातावरणात झालेला बदल लक्षात येतो. या हवाई तळावर आता अमेरिकेऐवजी चीनचा ताबा असणार आहे.

**चित्र गुंतागुंतीचं आहे. रशिया, चीन, भारत, ब्राझील यांसारखे देश अधिक आक्रमक होत आहेत. आपल्या देशातले उद्योजक तर आता अधिक जोरदारपणे पुढारलेल्या देशातल्या कंपन्या विकत घेत आहेत. (कुणीतरी याचा उल्लेख 'वेस्ट इंडिया कंपनी' असा केला आहे). आपण भारतीयांनी यामुळे हरखून जाण्याचं काय कारण आहे? शेवटी या साऱ्याचा सामान्य माणसाला काय लाभ होतो आहे; आणि हे करत असताना कोणाच्या तोंडचा घास घेऊन तर हे सारं होत नाही असे प्रश्न विचारावे लागतील.**

मुक्त बाजारावर आधारित जागतिकीकरण, त्याचं स्वरूप, त्याचा प्रसार करणाऱ्या संस्था, अमेरिकेच्या अर्थकारणाचा त्यातील सहभाग, या साऱ्यात गृहीत असलेलं लष्करीकरण या स्वरूपाच्या जागतिकीकरणाला होणारा विरोध हे विषय या सदरात प्रामुख्याने येतील. कारण यातली प्रत्येक गोष्ट आपल्यावर परिणाम करते आहे. खेडेगावातल्या शेतकऱ्याला बी-बियाणं, खतं कोणत्या दरात मिळतील, त्याचा माल बाजारात खपेल की नाही; त्याला आपली कर्ज भागवता येतील की नाही; कामगारांना युनियन स्थापन करता येतील की नाही हे सारं बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार ठरत आहे. पूर्वीप्रमाणे आता कामाचे ठराविक तास राहिले नाहीत. तुमच्या मुलांना आता नोकरीत दहा-बारा तास काम करायला सांगितलं जात आहे. हे पाहून पुन्हा एकदा आपण एकोणीसाव्या शतकातल्या नव-औद्योगिकीकरणाच्या गुलामगिरीसदृश काळाकडे वाटचाल करीत आहोत की काय असं वाटू लागतं. याउलट व्हेनेझुएलामध्ये २ डिसेंबरला जे सार्वमत घेतलं गेलं त्यात दिवसाच्या कामाचे तास कमी (सहा) करण्याचा एक प्रस्ताव होता. वेगळ्या कारणाने या प्रस्तावांची एकत्र बांधलेली मोळी जनतेने फेटाळली. पण मुक्त बाजारवाल्यांचे विचार आणि नवे प्रागतिक विचार यांतला फरक लक्षात येण्यासाठी या सार्वमतात असलेले जे विषय आहेत त्याबद्दल अधिक विस्ताराने मांडण्याची आवश्यकता आहे. त्यातून परिवर्तनाची दिशा अधिक स्पष्ट होईल. या सार्वमताबद्दल लवकरच लिहिण्याचा विचार आहे.

चित्र गुंतागुंतीचं आहे. रशिया, चीन, भारत, ब्राझील यांसारखे देश अधिक आक्रमक होत आहेत. आपल्या देशातले उद्योजक तर आता अधिक जोरदारपणे पुढारलेल्या देशातल्या कंपन्या विकत घेत आहेत. (कुणीतरी याचा उल्लेख 'वेस्ट इंडिया कंपनी' असा केला आहे). आपण भारतीयांनी यामुळे हरखून जाण्याचं काय कारण आहे? शेवटी या साऱ्याचा सामान्य माणसाला काय लाभ होतो आहे; आणि हे करत असताना कोणाच्या तोंडचा घास घेऊन तर हे सारं होत नाही असे प्रश्न विचारावे लागतील. मात्र रुपयाची किंमत वाढत गेली तर अनेक समीकरणं उलटीपालटी होऊ शकतात. सोबतीला जागतिक तापवानवाढीचं संकट वेगाने समोर येत आहे.

जाता जाता माध्यमांबद्दलही थोडं काही म्हणणं आवश्यक आहे. जाहिरातशरण कॉर्पोरेट माध्यमांकडून खुल्या लोकशाही पद्धतीची चर्चा वगैरेंची अपेक्षा ठेवणं म्हणजे अतीच होईल. आश्रयदात्या जाहिरातदारांचा मूड सांभाळून जमेल तेवढं आणि पचेल तेवढं सागणं इतकंच त्या चौकटीत शक्य आहे. यात व्यवस्थेच्या गंभीर प्रश्नांवर चर्चेपेक्षा सेक्स, हिंसाचार, खाजगी आणि सार्वजनिक भानगडींचं चर्वितचरण हे प्रश्न अग्रस्थानी आहेत. यासाठी स्वतंत्र बुद्धीऐवजी मॅनेजमेंटची कौशल्यं अधिक उपयोगी पडू शकतात. यात काम करणारी मंडळी जनतेपेक्षा त्या त्या कंपनीच्या भागभांडवलदारांना उत्तरं द्यायला बांधील आहेत. वाचक आणि प्रेक्षक ही त्यांची 'गिऱ्हाईकं' असणार आहेत.

हे असं चित्र असताना दुसरीकडे इंटरनेटवर अनेक दर्जेदार वेबसाईटस जागतिक पातळीवर उपलब्ध आहेत. त्या उत्कृष्ट माहिती पुरवू शकतात. आम्ही कोणत्याच कॉर्पोरेट देणग्या स्वीकारत नाही असं त्या अभिमानाने सांगत आपलं म्हणणं ठासून मांडत असतात. मात्र त्यांची धाव कॉर्पोरेट माध्यमांच्या मानाने तोकडी पडते. इंग्रजी भाषेचं ज्ञान आवश्यक असल्याने तीही एक मर्यादाच आहे. तरीपण माध्यमांचा विचार करता ती एक मोठी आशा आहे.

या सदरात प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संदर्भातले विषय असतील. सदराचं नाव 'कुंपणांपलीकडे' आहे. म्हणजे सर्व प्रकारची कुंपणं ओलांडून जाणं त्यात अभिप्रेत आहे. यात जाती, धर्म, देश आणि व्यक्तींच्या मनात असलेली अहंकारी कुंपणं या साऱ्यांचा समावेश असेल. मुख्य म्हणजे भांडवलाऐवजी मनुष्याला केंद्रस्थानी ठेवून नव्या जागतिकीकरणाची जी धडपड आता सुरू आहे, त्याची दिशा या साऱ्यांतून सूचीत व्हावी असा प्रयत्न असेल. विज्ञान, राजकारण, कला, तंत्रज्ञान यांपैकी कोणतेच विषय इथे वर्ज्य नसतील. स्थानिक महत्त्वाचे प्रश्नही कधी यात येऊ शकतात.

**अशोक राजवाडे**

ashokrajwade@gmail.com

बी-३०२, अमिषा अपार्टमेंट, लक्ष्मण म्हात्रे मार्ग, नवागाव,

दहिसर (प.), मुंबई ४०००६८.

फोन : ०२२-२८९५३६१२, भ्रमणध्वनी : ९२२३२४७४१२.

वाचणाऱ्याची रोजनिशी

# ''यशस्वी होण्याचा मार्ग एकच; आपण यशाच्या पाठीमागे न धावणं''

– कमल देसाई

सतीश काळसेकर

प्रश्न जनसामान्यांचा आहे. त्यांनी जागतिकीकरणाला निमंत्रण दिलेलं नाहीय, पण त्याला सामोरं जाणं या फार मोठ्या समूहाला भाग आहे. ते करताना आपली भाषा, संस्कृती, मूल्ये यांचाच त्यांना आधार आहे. आणखी वेगळा रस्ता त्यांना उपलब्ध नाहीय. इंग्रजीच्या पोटात शिरण्याची कुवत त्यांच्यात नाहीय. ते लिखित मराठीत शिकूनच मुळात एखाद-दोन पिढ्या झाल्यात. त्यापल्याड त्यांच्या कैक पटीने असेही लोक आहेत, जे लिखित मराठीतही अद्याप आलेले नाहीत. अशा अडाणी माणसांना टिकण्यासाठी, त्यांची इच्छा असो वा नसो; आपली भाषा, मूल्ये आणि संस्कृती यांचेच बळ वापरावे लागणार. ते तसं करतील. एका प्रकारे आपलं मराठीपण सांडलेल्या भद्र जनांना त्यांच्या मराठीपणाची जाणीवही हेच लोक देणार आहेत. आपलं मराठीपण टिकवणं व ते वापरून भद्रजनांना मराठी ठेवणं असं दुहेरी आव्हान गरीब मराठी भाषी लोकांपुढं आहे... प्रश्न लेखकांचा आहे. त्यांनी स्वत:ला कोणाशी जोडून घ्यायचं हा आहे. लेखकाचं नातं दु:खाशी, वेदनेशी असतं असं म्हणतात, तर स्वाभाविकच त्यानं या वर्गाशी स्वत:ला जोडलं पाहिजे. त्यांच्या जगण्याला त्यानं स्वर दिला पाहिजे... सजग आणि आस्थाशील चित्रण करणारा लेखकच मोठं काही निर्माण करू शकेल. तो आजच्या अशिक्षित, अल्पशिक्षित गटांमधून, स्त्रियांमधून, भटक्या-विमुक्तांमधूनच येईल. कारण आपल्या भाषा आणि संस्कृती यांचं अजून प्रकट न झालेलं केवढं तरी मोठं सुप्त संचित या गटांमध्ये निद्रिस्त आहे. आपल्याला आपलं मराठीपण टिकवावंच लागेल. कारण आणखी वेगळ्या रस्त्यानं हे शोषित समूह आपल्याला जाऊच देणार नाहीत.

**– रंगनाथ पठारे**

*'मराठी साहित्याचे भवितव्य' सर्वधारा ४.*

आपल्याला मांडायचे आहे आणि आपल्या मर्यादांनी ते मांडता येत नाही, असे काही आपल्या भोवतीच्या कोणी मांडले की मला मनापासून आनंद होतो. तसा आनंद मला या लेखाने दिला आहे. हे असे कवितेसंदर्भातही झाले आहे. आता अरुण काळेच्या 'शब्द' दिवाळी अंकात आणि अन्यत्रही आलेल्या कविता मला असाच आपण लिहिल्याचा आनंद देतात. किंबहुना हे जरा अधिकच होते आणि मग आता जितके चांगले, जितक्या विपुल संख्येने मराठी कवी कविता लिहीतच आहेत, आपल्याच मनातले बोलत आहेत तर आपण नाही लिहिले तरी चालेल अशा विचाराने डोळे भरून येतात. असा सुपीक काळ आपल्या उतरत्या दिवसांत पाहताना बरे वाटते. अर्थात माझ्या तरुण मित्रांना हे आवडत नाही. ही सबब उलथवून मी लिहायला हवे हा त्यांचा आग्रह मीही आजवरच्या नम्रतेतून स्वीकारतो. असो. मुद्दा आहे. तो रंगनाथ पठारेचा हा लेख आपण आपलासा करावा. असाच आणखी एक लेख आला आहे. 'आजचा सुधारक'च्या नोव्हेंबर ०७च्या अंकात. 'मराठी साहित्य विश्व : एक विश्लेषण'- श्रीकांत कारंजेकर. खरे तर हे पुनर्मुद्रण आहे, 'सत्याग्रही विचारधारा'च्या ऑगस्ट ०७ मधल्या लेखाचे. लेखक, प्रकाशक, वाचक अशा साहित्य व्यवहारातल्या तीन महत्त्वाच्या घटकांचा तपशीलवार उपलब्ध आकडेवारीनिशी केलेला विचार या लेखात आहे. (वितरक, प्रसारक, साहित्य संस्था, शासकीय मंडळे यांनाही या संदर्भात तपासायला हवे.) लेखाचे नांदीचे वाक्य आहे. ''मराठी साहित्यविश्व एका अरिष्टात सापडले आहे. बहुतांश लेखनामध्ये कसदारपणा नाही आणि मोजक्याच चांगल्या साहित्याला वाचक नाहीत.'' आणि लेखाचे भरतवाक्य आहे, 'लेखकांनी कसदार साहित्यनिर्मिती करणे, प्रकाशकांची अनावश्यक मक्तेदारी मोडणे व वाचकांची अभिरुची घडवणे या महत्त्वाच्या तीन बाबींमध्ये मराठी साहित्याच्या उज्ज्वल भवितव्याची नांदी राहणार आहे.'' आपण पहिल्या आणि तिसऱ्या बाबींसंदर्भात तरी आपला-आपला वाटा उचलावा. ही गरज मानायला हरकत नाही. आपण उपरोक्त दोन्ही लेख मात्र मिळवून वाचावेत इतके महत्त्वाचे नक्कीच आहेत.

'पंचधारा' (मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश, इसामिया बाजार, हैदराबाद ५०००२७) हे महाराष्ट्राबाहेर प्रसिद्ध होणारे त्रैमासिक : प्रकाशनातले सातत्य (वर्ष ५० वे) आणि अंक नेहमीच महत्त्वाचे साहित्य देणारे; 'गजानन माधव मुक्तिबोध', 'गालिबची पत्रे', 'हैदराबाद शहर' असे कितीतरी महत्त्वाचे अंक, अनेक मराठीतर भाषांमधील साहित्याचे मराठीतले अनुवाद हे त्यांचे वैशिष्ट्य असते. आत्ताचा त्यांचा अंक (एप्रिल ते सप्टेंबर २००७) हा आहे, 'आंतरभारती अनुवाद विशेषांक'- अतिथी संपादक - चंद्रकांत पाटील. चंद्रकांत पाटीलने त्यांच्या अनेक प्रकल्पांत त्यांना मोलाची मदत याआधीही केली आहे. आंतरभारती संकल्पनेचे शिल्पकार साने गुरुजी यांना हा अंक समर्पित करण्यात आला आहे. साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या तिसऱ्या आंतरभारतीय साहित्य संवाद संमेलनावर हा विशेषांक आधारित आहे. अंकाला दोन संपादकीये आहेत. पहिले उषा जोशींचे 'पंचधारा'च्या वतीने आणि दुसरे अतिथी संपादक चंद्रकांत पाटील यांचे

प्रास्ताविक. दोन्हींचे मुळातून वाचणे आवश्यक आहे. कवितेचा अनुवाद या विभागात विष्णु खरे यांची निशिकांत ठकार यांनी घेतलेली मुलाखत, विष्णु खरेंनी त्या प्रसंगी वाचलेल्या तीन कविता आणि नंतर 'कोशिश- (स्वामीनाथके लिए)' ही त्यांची मूळ हिंदी कविता आणि त्याची आठ भारतीय भाषा आणि जपानी, जर्मनी, आणि इंग्रजी मिळून अकरा भाषांतली अनुवाद-रूपे. विष्णु खरे यांची ही मुलाखत आणि कवितांचे वाचन ज्यांनी पाहिले आणि ऐकले आहे, त्यांच्यासाठी तो साहित्यव्यवहारातल्या वावरातला अद्‌भुत दिवस होता. आता त्यावेळी हजर नसलेल्यांसाठी 'पंचधारा'चा हा अंक तितकाच महत्त्वाचा. अंकात भाषांतराच्या संदर्भात अन्य कितीतरी मोलाच्या गोष्टी आहेतच. ''कुकूऽऽऽच कूऽऽऽ'' या दारिओ फो या नोबल पारितोषिक विजेत्या नाटककाराचे प्रवीण भोळे अनुवादित नाटक आणि शिवाय अन्य कितीतरी. विष्णु खरे यांनी याच मुलाखतीत मराठी अनुवादासाठी आपले कोणतेही लेखन विनाअट मोकळे ठेवल्याचे जाहीर केले आहे. 'पंचधारा'चा हा अंक तर आपण मिळवावाच शिवाय त्यांना अन्य मदतही करावी आणि त्यांच्या मराठी भाषा-संगोपनासाठी चाललेल्या कामाला मदत द्यावी.

डिसेंबर २००७च्या रोजनिशीत काही दिवाळी अंकांसंदर्भातली निरीक्षणे नोंदविली होती. तोपर्यंत काही महत्त्वाचे अंक पाहता आले नाहीत. आजही तसे पाहणे आणि अंशत: वाचणे संपले आहे असे नाही. तरीही काही गोष्टी आपणांपर्यंत आणाव्यात आणि त्यापलीकडचे राहिलेले आपल्यावर सोपवावे अशा हेतूने काही बोलून घेतो.

दिवाळी अंकांचा हा खास मराठी भाषेतला उत्सव मला महत्त्वाचा वाटतो. शिवाय दरवर्षी त्यात होणारी वाढ आणि एकूण प्रकाशित लेखनातला त्याचा गंभीर वाटा वाढतानाही दिसतो आहे. 'साधना'चा मजकूर दोन अंकांत विभागला जावा इतक्या मेहनतीचा आहे. 'चिन्ह', 'शब्द', 'मौज' या अंकांमध्ये अंतर्भूत असलेल्या अनेक चित्रकारांच्या कलाकृतींच्या आर्टप्लेटस्, 'खेळ', 'दर्शन', 'चिन्ह', 'आशय', 'शब्द', 'वसा' या अंकांची मुखपृष्ठे हे सारे आपण डोळ्यात साठवावे असे आहे. 'शब्द'च्या मुखपृष्ठासाठी प्रभाकर कोलते यांनी 'तिचे रजत सिंहासन' ही जोगेन चौधरींची कलाकृती निवडली होती. ती बदलली आहे. बदलामागचा खुलासाही संपादकांनी दिला आहे; ''बेलगाम आणि अकारण, निव्वळ धाडसासाठी धाडस हे कलाविचारात अप्रस्तुत ठरते असे आम्ही मानतो.'' त्यांची ही भूमिका स्वीकारूनही या चित्रावर आपण अन्याय करत आहोत असे मला वाटते. आपण आपले मतही अवश्य कळवावे. प्रभाकर कोलतेंच्या विश्लेषणानंतर तर ते अवश्यच अग्रभागी असायला हवे होते. अर्थात आताही ते मुखपृष्ठाच्या आतल्या अंगाला नीटपणे दिले आहे. हा लाभ आहेच. 'खेळ'च्या अंकावर पिकासोचे चित्र आणि आत त्याची रेखाटने आहेत. पिकासोच्या कविताही 'खेळ'च्या अंकात प्रथमच मराठीत आल्या आहेत. एका कवीच्या चित्रकृती किंवा एका चित्रकाराच्या कविता अशा दुहेरी वाटांनी त्या कविता, रेखाटने आणि चित्र यांकडे पाहता येईल. दिवाळी अंकांचे मुद्रण, मांडणी यांची कलात्मक जाण अशा अंकांतून पाहता येते.

'शब्द' दिवाळी अंकात 'मागे वळून बघताना'– असे काही लेख आहेत. त्यात उजवे-डावे करता येणे कठीण आहे. आता आपल्या आपल्या आवडी सोबत असतातच. त्यामुळे गणेश देवींचे हिमालयाकडे वळणे, नरेंद्र जाधवांचे भारतात परतणे, प्रभाकर कोलते यांचे 'स्वेच्छानिवृत्त' होणे किंवा कुमार केतकरांनी, ''माझ्यासारखे अनेक 'मार्क्सवादी' फ्रॉइडला आणि गांधीजींना जे कृष्णमूर्तींना आणि आइन्स्टाईनला, चे गव्हेराला आणि बीटल्सना, आपल्या व्यक्तिगत जीवनात 'इंटिग्रेट' करू शकले आहेत. प्रत्येक मार्क्सवाद्याला हे जेव्हा उमगते की जीवन हे विचारसरणीपेक्षा विशाल आहे; पण ती विशालता समजण्यासाठी विचारसरणीची गरज आहे, तेव्हा त्याचा मार्क्सवाद आणि जीवन अधिक प्रकल्भ होत जाते.'' असे म्हणणे हे खूप जवळचे वाटते. (फक्त यात बाबासाहेब आंबेडकरांनाही गुंतवले असते तर अधिक आवडले असते, असो. नामदेव ढसाळचे तर गद्य आणि कविताही खास त्याची आहे. पण या सगळ्यात जिव्हारी लागावे असे लेखन कमल देसाईंचे फक्त पानभर. त्यातले हे अर्काचे वाक्य; ''यशस्वी होण्याचा मार्ग एकच; 'आपण यशाच्या पाठीमागे न धावणं'. त्याशिवाय जीवन खूप मोठं आहे.'' 'शब्द'च्या अंकातल्या अरुण काळे, प्रभा गणोरकर, मंगेश नारायणराव काळे आणि शिवाय नामदेव ढसाळ यांच्या कविताही आपण अवश्य वाचाव्यात. अरुण जाखडे, अतुल कुलकर्णी, मनस्विनी लता रवींद्र यांची आत्मकथनेही अंकाचे मोल वाढवणारी आहेत. एकूण 'शब्द'च्या संपादकांची मेहनत मानायलाच हवी. फक्त येशू पाटील त्याची आर्थिक जोडाजोड कशी करतात, याचे कौतुकासहित आश्चर्य वाटते. कारण जाहिरातींचा वाटा नगण्य आहे.

'संवेद'मधल्या विनोदकुमार शुक्लांच्या हिंदी मुलाखतीबद्दल मी आधीच बोललो होतो. आता ती मुलाखत, (अनुवाद : गणेश विसपुते) आणि त्यांच्या कविता (अनुवाद : प्रफुल्ल शिलेदार) 'खेळ'च्या दिवाळी अंकात एकत्र आल्या आहेत. भुजंग मेश्रामची कविता 'अरुण काळेसाठी ब्युटिफुल कृष्णविवर अर्थात म्होब्बस्से' ही खासच आहे. नामदेव ढसाळ, भुजंग मेश्राम, अरुण काळे ही मराठी कवितेची खासियत आहे. भुजंग मेश्रामच्या अवेळी जाण्याने हा मधला दुवा निखळला आहे. आणि ही हानी तूर्तास तरी भरून येणारी नाही. सुरेश कदम आणि संतोष पद्माकर पवार यांच्याही चांगल्या कविता याच अंकात आहेत.

'परिवर्तनाचा वाटसरू'चा पूर्ण अंक कवितांचा आहे. तिथेही भुजंग मेश्राम आहेच. शिवाय आजचे अनेक महत्त्वाचे कवी आणि श्रीधर तिळवेची दीर्घ कविता. तिळवेच्या अन्य लेखनासारखाच काहीसा आनंददायी छळ इथेही आहेच. साहिल परवेज हा एक आजवर अनोळखी असलेला कवी इथे आहे. शिवाय अंकाच्या मुखपृष्ठावरच्या पॉल युलार्ड या फ्रेंच कवीच्या राजीव कालेलकर याने अनुवादित केलेल्या ओळी या अंकाच्या सुराशी जुळणाऱ्या. विष्णु खरेची आणखी एक मुलाखत 'नवाक्षर दर्शन'च्या अंकात आहे. हेमंत कुकरेतीने घेतलेली ही हिंदीतली मुलाखत बलवंत जेऊरकरने अनुवादित केली आहे. 'अनुभव'च्या अंकातले काही आधी वाचायचे राहिले होते. तर त्यातली 'शेती पाहावी करून' (श्रीनिवास पंडित) आणि 'आणखी मोठ्या रेषेसाठी' (संजय जोशी) ही आत्मकथने; 'ललित'मधला म.वा.धोंडांचा लेख 'कुठली सीता, कुठला राघव! आणि कुठले रामराज्य', 'मौज'मधला 'नेक्रोपोलिस' हा महेश एलकुंचवारांचा लेख हे आजवर वाचलेल्यातले अधोरेखित करावे असे लेखन. म.वा.धोंडासारखे खास त्यांचेच असे लेखन आता पाहायला मिळणे दुर्लभच. श्री.पु.भागवतांविषयी अनेक ठिकाणी लेखन असणे अपरिहार्यच होते. 'रुची', 'मौज', 'ललित', 'भाषा आणि जीवन', 'आशय', 'दर्शन', अशा अनेक अंकांतून ते आले आहे. त्यांचे अप्रकाशित भाषणही 'आशय'च्या अंकात आहे. थोड्याफार फरकाने सरोजिनी वैद्य यांच्याही आठवणी आल्या आहेत. श्री.पु.भावगतांची काही पत्रे 'ललित'च्या अंकात आहेत.

अरुण जाखडेंच्या दिवाळी अंकातील सहभागाविषयी जरा वेगळे वाटते. यावर्षी त्यांनी तीन अंक आपल्याला दिले आहेत. 'पद्मगंधा', 'उत्तम अनुवाद' आणि 'आरोग्य दर्पण'. आजघडीला 'पद्मगंधा प्रकाशन' हे मराठी प्रकाशन व्यवसायातले महत्त्वाचे नाव आहे. त्यांचा व्यवसायही वरकरणी बरा असावा असे वाटते. मात्र ते ज्या उत्साहात, उमेदीत आणि गांभीर्याने प्रकाशन व्यवसायात पावले टाकत आहेत त्याला दाद द्यायलाच हवी. त्यांचे दिवाळी अंक हा त्यांच्या प्रकाशन व्यवसायाच्या नियोजनाचा भाग आहे. काहीशी पूर्वतयारी, रियाझ आणि येत्या काळाचा मागोवा या सर्वांचा आढळ त्यांच्या अंकात पाहता येतो. र.धों.कर्वे यांच्याविषयीच्या येत्या काळातला सात खंडांचा प्रकाशन प्रकल्प हे धाडसी पाऊल, सामाजिक जबाबदारीचे भान आणि व्यवसायाचे गणित अशा अंगांनी त्याकडे पाहणे गरजेचे आहे. 'उत्तम अनुवाद' आणि 'आरोग्य दर्पण' यांना मी अजून हात लावलेला नाही. 'पद्मगंधा'मधले काही लेखन वाचले. त्यात 'मोहनमाया आणि मी' हा रामदास भटकळांचा लेख आपल्याला 'मोहन माया' या ग्रंथाकडे वळवायला पुरेसा आहे. पण त्यातली विलास सारंग यांची संजय आर्वीकर यांनी घेतलेली मुलाखत ही 'पद्मगंधा'ची खास भेट आहे. संजय आर्वीकर हे अशा अभ्यासपूर्ण मुलाखतीसाठीच ओळखले जातात. ती ओळख त्यांनी इथे अधिकच घट्ट आणि पक्की केली आहे. संजय आर्वीकरांचे त्यासाठी अभिनंदन.

असे बोलता बोलता बोलणे नेहमीहून अधिक झाले. आपण नव्या वर्षात प्रवेश करीत आहोत. कसाही विचार केला तरी वर्षारंभाचा उत्साह असतोच. तो असावाही. तर आरंभीच्या रंगनाथ पठारेंच्या अवतरणाचा सन्मान करीत येत्या काळाला सामोरे जाण्यासाठी आपणा सर्वांना शुभेच्छा.

आमेन.

**सतीश काळसेकर**
'कबीरा', चित्रकुटी कलाग्राम, मु.पो.आंबेघर, ता.पेण,
जि. रायगड ४०२ १०७
भ्रमणध्वनी : ९४२२६८९५५९

---

*पृष्ठ २ वरून)*
वाटलं तरी विषम हवामानामुळे ते शक्य होत नाही. विषम हवामानाचा त्रास त्यांना होत नसतो. आपल्याकडच्या सरकारी नोकरी करणाऱ्यांना तो होत असतो. विषम हवामानाचा त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झालेला असतो. हे आपण लक्षात घेतलं पाहिजे.

अशाही परिस्थितीत मुलांना शिकायचं असतं. त्यांना चांगल्या शाळा नको असतात, चांगले शिक्षक नको असतात, चांगली पाठ्यपुस्तके नको असतात, कशीतरीच छापलेली, काहीतरीच मजकूर असलेली पुस्तकं त्यांना हवी असतात. त्यांना चांगलं शैक्षणिक धोरण नको असतं, वेठीला धरल्यासारखं शिकून घेणं त्यांना आवडतं. काहीही अभ्यासक्रम असला तरी तो करायचा, खूप पैसे देऊन करावा लागला तरी करायचा. शर्यतीच्या घोड्यासारखं धावावं लागलं तरी धावायचं असं त्यांना वाटत असतं.

तरीही मुलं शिकतच असतात. आमच्या सरकारांनी, राज्यकर्त्यांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी, विचारवंतांनी, उद्योगपतींनी आपल्या शिक्षणव्यवस्थेकडे जितकं कमी लक्ष देता येईल तितकं बरं. शिक्षणसंस्था काढाव्याच. कारण तो एक उद्योगधंदा आहे. औद्योगिकीकरणाचं स्वागतच केलं पाहिजे यातही काही शंका नाही.

माझंच काहीतरी चुकत चाललेलं आहे. मला दिवसेंदिवस निरक्षर व्हावं वाटू लागलेलं आहे. वरचं हे सगळं अक्षरओळख विसरण्यापूर्वी कसंतरी ओढून काढलं आहे हे आपल्या लक्षात येईलच.

**वसंत आबाजी डहाके**
कॅक्टस, दक्षिण माळटेकडी,
परिगणित कॉलनी, अमरावती ४४४६०६.
भ्रमणध्वनी : ९८९०३६२७०३

# २००८ मध्ये 'साधना'तून वाचा...

'रोल मॉडेल्स' म्हणावेत अशांचे
व्यक्तिगत जडणघडण,
जीवनविषयक दृष्टिकोन व
सामाजिक परिस्थितीवर
भाष्य करणारे लेख...

**आम्ही असे घडलो**

वेगवेगळ्या सभा-समारंभात
अनेक चांगली भाषणे होतात,
त्यातली काही भाषणे
जशीच्या तशी
म्हणजे अगदी...

**थेट सभागृहातून**

घटना कोणतीही असो,
त्यांच्याकडे पाहण्याची
दिल्लीची अशी एक
दृष्टी असते,
एक निरीक्षक ती दाखवणार...

**दिल्ली दरवाजातून**

द हिंदू, फ्रंटलाइन,
सेमिनार, तहलका,
इ.पी.डब्ल्यू., आऊटलुक,
द इकॉनॉमिस्ट इ.
नियतकालिकांतील लेखांचे...

**अनुवाद**

सामाजिक बदलांसाठी
सतत धडपडणाऱ्यांची
व वेगळ्या वाटा
चोखाळणाऱ्यांची दखल

**कार्यकर्ता**
**+**
**विधायक वाटा**

वाचकांना आपल्या मनातील
खळबळ व्यक्त करण्यासाठी राखून
ठेवलेली जागा...

**प्रतिसाद**
**+**
**चर्चा-मंथन**
**+**
**वाद-संवाद**

**गेल्या वर्षीची 'ही' सदरे यावर्षीही**

- **परामर्श** : गोविंद तळवलकर
- **वाचणाऱ्याची रोजनिशी** : सतीश काळसेकर
- **आदिशक्ती** : प्रतिमा जोशी
- **तिरकस चौकस** : हेरंब कुलकर्णी
- **नोकर'शाई'चे रंग** : ज्ञानेश्वर मुळे
- **रंगपरिसर** : माधव वझे
- **परिघावरून** : वैशाली रोडे
- **बालसाधना** : राजीव तांबे

**याशिवाय**

इंग्रजी ग्रंथपरिचय, विज्ञानविषयक लेख,
व्यंगचित्रे-रेखाचित्रे, कविता
आणि
समकालीन घटना-घडामोडींवरील व
त्या अनुषंगाने विशेष लेख...

**विशेषांक**

- ११ जून : साने गुरुजी स्मृती
- १५ ऑगस्ट : साधना वर्षारंभ
- नोव्हेंबर : दिवाळी

# २००८ मध्ये 'साधना'तून वाचा...

प्रत्येक वेळी इंडियाच भारताचे
शोषण करतो असे नाही,
भारतातल्या भारतातही शोषणाची
प्रक्रिया निरंतर चालू असते...

**ग्रामवास्तव**

**: आसाराम लोमटे :**

माणसांची...
प्राण्यांची...
निसर्गाची...
ही तर सर्वांचीच...

**कैफियत**

**: राजन गवस :**

जातीची, धर्माची, भाषेची,
प्रदेशाची, कार्यक्षेत्राची
आणि विचारांची कुंपणं ओलांडून
गेल्यावर जे काही दिसतं ते...

**कुंपणांपलीकडे**

**: अशोक राजवाडे :**

कानावर पडतंय,
समोर दिसतंय,
मनात येतंय, ते व्यक्त करून
मोकळं व्हावं, म्हणून...

**चौक**

**: वसंत आबाजी डहाके :**

बास झालं,
साहित्यातून वास्तव समजून घेणं,
आता जरा उलटं करून पाहू या
असं वाटायला लागलंय...

**सत्यातून-साहित्याकडे**

**: अवधूत परळकर :**

'फार कमी अभ्यास करून
फार जास्त बोललं जातं'
असा विषय म्हणजे अर्थकारण –
त्यावरील अभ्यासपूर्ण लेखन...

**अर्थक्षेप**

**: अभय टिळक :**

राज्याच्या व देशाच्या
बदलत्या राजकारणाचे
विश्लेषण करणारे
सखोल चिंतन...

**प्रवाह**

**: भा. ल. भोळे :**

भारताचे परराष्ट्र धोरण,
शेजारी राष्ट्रांशी संबंध व
जागतिक स्तरावरील घटनांचे
ताणेबाणे उलगडून दाखवणारे...

**आंतरराष्ट्रीय राजकारण**

**: अशोक चौसाळकर :**

दर पंधरा दिवसांनी बापट सर
साधना कार्यालयात येणार,
तेव्हा आम्ही म्हणणार... 'सर,
या विषयावर टाका ना जरा...

**दृष्टिक्षेप**

**: राम बापट :**

प्रत्येक महिन्यात, 'वेगळा विषय'
आणि 'लेखनाचा दर्जा'
या दोनच निकषांवर निवडलेल्या
सहा नवीन पुस्तकांची...

**साधना शिफारस**

**: संतोष शेणई :**

तीन तपे चांगली मशागत
केल्याने कुळागरात बरेच
काही उगवलेय, बहरलेय
त्यातील थोडेसे...

**कुळागर**

**: सुभाष भेण्डे :**

आपल्या सभोवताली
बरेच काही घडतेय,
संवेदनशील व्यक्तीने,
समीक्षकाने टिपलेले...

**यक्षाच्या सरोवराकाठी**

**: रा. ग. जाधव :**

दिल्ली दरवाजातून...

# २००८... आव्हानांचे वर्ष : सांप्रदायिकतेचा मोठा धोका

निरीक्षक

२००७ वर्षाच्या सरत्या दिवसांतील घटना या २००८ मधील विशेषत: राजकीय घटनांचा घाट-आकार निश्चित करणाऱ्या ठरतील. गुजरातमध्ये नरेंद्र मोदी यांचा झालेला विजय ही त्याची नांदी मानावी लागेल. २००८ मध्ये (ठरल्या वेळेप्रमाणे झाल्यास) लोकसभेच्या निवडणुका आहेत. त्यामुळे पुढील वर्ष हे पूर्णपणे निवडणुकांचेच वर्ष राहील. स्वाभाविकपणेच प्रत्येक घटनेवर निवडणुकीची छाप राहणे अटळ असेल व त्यामुळेच राजकारण राजकीय मुद्दे हे आघाडीवर राहतील. या पुढील घटना लक्षात घेता मोदी यांचा गुजरातमध्ये झालेला विजय, भाजपला एकामागून एक मिळत असलेले यश, काँग्रेस व इतर धर्मनिरपेक्ष शक्तींची पिछेहाट होत असल्याचे चित्र या समंजस मनाला चिंता निर्माण करणाऱ्या घडामोडी आहेत. पाकिस्तानात बेनझीर भुट्टो यांच्या हत्येचा परिणामही भारतातील राजकारणावर आणि समाजमनावर होणे स्वाभाविक आहे आणि त्यातूनही देशातील सांप्रदायिक शक्तींना ताकद मिळू शकते ही बाबही दुर्लक्षूत चालणार नाही. त्यामुळेच सांप्रदायिक शक्तींना लगाम लावण्यासाठी धर्मनिरपेक्ष किंवा समंजस मनोवृत्तीच्या घटकांचा कस लागणार आहे.

गुजरातमध्ये मोदी यांनी विकासाच्या मुद्यावर निवडणूक जिंकल्याचा दावा भाजपचे नेते करीत आहेत. परंतु सोहराबुद्दीनची हत्या, रामसेतू, दोन रुपयांचे नाणे हे मोदी यांनी उपस्थित केलेले मुद्दे सांप्रदायिक नव्हते? सोनिया गांधी यांनी 'मौत का सौदागर' म्हटले म्हणून आपण सांप्रदायिक मुद्दे उपस्थित केले असा तर्क मोदी आणि भाजपतर्फे दिला जातो, परंतु दुसऱ्याने केलेल्या चुकीला किंवा अपराधाला आपणही प्रतिअपराध किंवा प्रतिचूक करून प्रत्युत्तर देण्याचा हा प्रकार आहे. मोदींनी तो केला आणि विकासापेक्षा सांप्रदायिकता अधिक चलनी आहे व ती राजकीय विजय मिळवून देते हे सिद्ध केले. दुसरीकडे काँग्रेसनेही काही घोडचुका केल्या. काँग्रेसचे नेतृत्व गुजरातबद्दल काहीसे गाफील राहिले हे आता स्पष्ट झाले आहे. मोदी यांच्याविरुद्ध पक्षांतर्गत झालेले बंड, रा.स्व.संघ व विश्व हिंदू परिषदेचा मोदी यांच्यावरील राग व त्यांनी मोदींबरोबर पत्करलेला असहकार यामुळे मोदी यांचा पराभव करू शकतो असा समज किंवा भ्रम काँग्रेसमध्ये निर्माण झाला. तसे पाहिल्यास गुजरातमध्ये यावेळी काँग्रेसने कधी नव्हे तो एकजुटीने सामना केला परंतु बंडखोरांवर नको तेवढे अवलंबून राहिल्याने त्यांना तोटा झाला.

गुजरातमध्ये मोदी यांचा विजय व त्याचवेळी लालकृष्ण अडवाणी यांना भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून जाहीर करण्याची घोषणा यांचाही परस्परसंबंध आहे. गुजरातमधील विजयानंतर मोदी हे भाजपचे दुसऱ्या क्रमांकाचे नेते आपोआपच झाले आहेत. अडवाणी व मोदी यांच्या जोडगोळीकडे पक्षाची सूत्रे जाणार असल्यास पक्षाचा भर सांप्रदायिकतेवर असणेही नैसर्गिकपणे अपरिहार्य आहे. गुजरातचा विजय हा भारतीय राजकारणाला वळण देणारा आहे आणि मतदारांचा कल आता भाजपला स्वीकारण्याकडे अधिक असल्याचे गुजरात-हिमाचलमधील निकालांवरून स्पष्ट होते असे सांगून अडवाणी यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विजय मिळेल असे भाकितही करून टाकले.

वरील पार्श्वभूमीवरच २००८ मधील घडामोडींकडे पहावे लागेल. ईशान्य भारतातील मेघालय, नागालँड व त्रिपुरा या तीन राज्यांत; जम्मू-काश्मीर, दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि कर्नाटक या अन्य सहा राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश व छत्तीसगढ येथे भाजपची सरकारे आहेत. दिल्लीत काँग्रेसचे सरकार आहे. मध्य प्रदेश व छत्तीसगढमध्ये काँग्रेसच्या पुनरुज्जीवनाची काही लक्षणे दिसू लागली आहेत, कारण या राज्यातील अलीकडच्या काही पोटनिवडणुका (लोकसभा व विधानसभा) काँग्रेसने जिंकलेल्या आहेत. परंतु या हिंदीभाषक राज्यात काँग्रेसला केवळ भाजपशीच नव्हे तर बहुजन समाज पक्षाशीही मुकाबला करावा लागणार आहे. गुजरातमध्ये बहुजन समाज पक्षामुळे काँग्रेसला सुमारे दहा ते बारा जागांचे नुकसान झाले तर हिमाचल प्रदेशातही या पक्षामुळे काँग्रेसला पाच ते सात जागांचा तोटा झाला असे काँग्रेसतर्फे सांगितले जाते. गुजरातमध्ये बहुजन समाज पक्षाला खातेही उघडता आले नाही, पण हिमाचलमध्ये त्यांनी खाते उघडले. मुद्दा हा आहे की बहुजन समाज पक्ष हा एका अर्थाने काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष शक्तींच्याच मुळावर येऊ पहात आहे. त्याचबरोबर या पक्षाचे नेतृत्व अशा लहरी नेत्याकडे आहे की त्या नेतृत्वाबरोबर हातमिळवणी करणेही खात्रीशीर नाही. त्यामुळे ज्या राज्यांमध्ये भाजप विरुद्ध काँग्रेस अशी सरळ लढत आहे, तेथे बहुजन समाज पक्षाचा धोका काँग्रेसला आहे. बहुजन समाज पक्षाचा इतिहास लक्षात घेता सत्तेसाठी ते प्रसंगी भाजपशीही हातमिळवणी करू शकतात. म्हणजेच काँग्रेसला राजकीय तोटे व नुकसान होण्याची शक्यता अधिक दिसून येते. राज्यांचे ठीक आहे, परंतु खरे आव्हान असेल ते लोकसभा निवडणुकीत बहुजन समाज पक्षातील काही खात्रीलायक व्यक्तींच्या सांगण्यानुसार पक्षाने देशातील दलित बहुसंख्यांक अशा २०० मतदारसंघांवर लक्ष केंद्रित करण्याचे

ठरविले आहे. पैशाची चिंता पक्षाला नाही, त्यामुळे या मतदार संघांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केल्यास व त्यापैकी तीस ते चाळीस जागा पक्षाच्या पदरात पडल्या तरी संभाव्य केंद्र सरकारच्या निर्मितीमध्ये मायावती यांची भूमिका निर्णायक राहू शकते. आगामी काळात मायावती व जयललिता या दोन्ही नेत्यांच्या पक्षांना यशाची शक्यता वर्तविली जात आहे आणि त्यामुळेच संभाव्य राजकीय रचनेतील या नेत्यांची भूमिका निर्णायक राहील, त्याचप्रमाणे राजकीय अस्थिरतेलाही त्याच कारणीभूत ठरू शकतात. या सर्व भावी शक्यता लक्षात घेऊनच काँग्रेसच्या काही नेत्यांनी आता मुलायमसिंह यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षाबरोबरचे तुटलेले बंध पुन्हा जोडण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. परराष्ट्रमंत्री प्रणव मुखर्जी, संसदीय कामकाजमंत्री प्रियरंजन दासमुन्सी आणि परदेशी भारतीय विभागांचे मंत्री वायलर रवी हे या कल्पनेचे पुरस्कर्ते आहेत आणि त्यांनीच याबाबत पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या मुलायमसिंह व विशेषत: अमरसिंह यांचा मनापासून दुस्वास करतात. त्याला कारणे काहीही असोत, परंतु राजकारणात सर्व प्रकारच्या घटकांबरोबर संबंध राखावे लागतात, राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो हे भान सोनिया गांधी यांना आणावे लागेल. उत्तर प्रदेशात मायावती यांच्यापेक्षा समाजवादी पक्ष हा अधिक खात्रीशीर सहकारी पक्ष होऊ शकतो, याची जाणीव हळूहळू काँग्रेसला होऊ लागल्याची चिन्हे आहेत. त्याबाबत कितपत प्रगती होईल याचे उत्तर आगामी काळच देईल. त्याचबरोबर अडवाणी-मोदी यांच्या नेतृत्वाखालील सांप्रदायिकतेशी लढाई करताना मुलायमसिंह यांची साथ काँग्रेसला अधिक लाभदायक ठरू शकते, हेही लक्षात ठेवावे लागेल. थोडक्यात पुढचे वर्ष हे राजकीय फेरजुळणीचेही राहील.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व त्यांच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीलाही आता आण्विक करारावर आततायी पाऊल उचलणे शक्य होणार नाही. घडामोडींचा वेग लक्षात घेता हा मुद्दा ताणून धरण्याबाबत त्यांना फेरविचार करावा लागेल. मार्क्सवाद्यांचे राष्ट्रीय अधिवेशन मार्चच्या अखेरीला होत आहे आणि त्यात त्यांची भावी राजकीय दिशा काय राहील हे जाहीर होईल. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचेही राष्ट्रीय अधिवेशन त्याच्याच आसपास होणार आहे. त्यामुळे डाव्यांची भावी भूमिका या निमित्ताने स्पष्ट होईल. दिल्लीत तीन वर्षांपूर्वी झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात मार्क्सवाद्यांनी तिसरा पर्याय उभारण्याची भाषा केली होती, परंतु ती प्रत्यक्षात येण्याची शक्यता नाही. उलट धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा पुन्हा राष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी येण्याची शक्यता दाट आहे.

एकीकडे राजकीय आघाडीवर सांप्रदायिकतेच्या मुद्याचा वाढता धोका दिसून येतो. तर दुसरीकडे आर्थिक आघाडीवरील आव्हानेही मोठी आहेत. सर्वात मोठे आव्हान कृषि क्षेत्राकडून आहे. शेतीखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटताना दिसत आहे. योजना आयोगाच्या अधिकृत माहितीनुसार देशातील साठ टक्के शेतकरी शेतीचे क्षेत्र सोडू इच्छितात. त्याच्याच जोडीला देशातील शेतीची उत्पादकता कमी होत आहे. चाळीस टक्के पाण्याखालील जमिनीतून शंभर टक्क्यांसाठी अन्नधान्य निर्मितीचे हे आव्हान आहे. साठ टक्के जमीन ही पावसाच्या लहरीवर अवलंबून असल्याने ती खात्रीशीर मानता येणार नाही. त्यामुळे शंभर टक्क्यांची भूक भागविण्याइतक्या अन्नधान्याची उत्पादन क्षमता या जमिनीत निर्माण करावी लागणार आहे. सध्या सर्वात मोठे संकट आहे ते पेट्रोलियम पदार्थांच्या दरवाढीचे. तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमती शंभर डॉलर्सच्या उंबरठ्यावर आहेत व तज्ज्ञाच्या म्हणण्यानुसार त्या शंभरीही पार करू शकतात. सध्या तरी सरकारने या किंमतीनुसार देशातील पेट्रोल व डिझेलचे भाव वाढविलेले नाहीत. परंतु ही परिस्थिती फार काळ राहू शकणार नाही. ही स्थिती अशीच राहिल्यास देशातील तेलकंपन्या दिवाळ्यात निघतील. त्यामुळे पेट्रोलियम पदार्थांचे भाव वाढविणे अनिवार्य होणार आहे. परंतु नऊ राज्यांमधल्या विधानसभा निवडणुका तोंडावर असताना, व लोकसभेची निवडणूकही दरवाजा ठोठावत असताना पेट्रोलियम पदार्थांची भाववाढ करण्याचा अप्रिय निर्णय सरकार घेणार आहे काय? सध्या भारतीय रुपया हा अमेरिकेन डॉलरच्या तुलनेत अधिक मजबूत झालेला आहे व त्यामुळे तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमती वाढूनही सरकार त्या तगवून नेत आहे. परंतु मजबूत रुपयाचा दुसरा प्रतिकूल परिणामही होत आहे. याचा प्रतिकूल परिणाम भारताच्या निर्यातीवर होत आहे आणि त्याचा फटका रोजगाराला बसत आहे. कारण निर्यातीवरील प्रतिकूल परिणामामुळे निर्यात कमी होऊ लागली आहे आणि निर्यातबाजारावर अवलंबून असलेल्या रोजगाराच्या संधीही कमी होत आहेत. काही लाख लोकांना याचा फटका बसू शकतो अशी माहिती वाणिज्यमंत्री कमलनाथ यांनी साक्षात् लोकसभेत दिली होती. तेव्हा एकीकडे राजकीय कसरती तर दुसरीकडे आर्थिक आव्हाने अशी ही परिस्थिती आहे. यातूनच डॉ.मनमोहनसिंग सरकारला समतोल अर्थसंकल्प सादर करण्याची तारेवारची कसरत करावी लागणार आहे. निवडणुकांचे वर्ष असल्याने व डॉ.मनमोहनसिंग सरकारचा हा अखेरचा अर्थसंकल्प असल्याने तो कठोर असणार नाही यावर साहजिकच भर असेल. परंतु वरील काही आव्हानांची जी झलक आहे, ती लक्षात घेता लोकप्रिय अर्थसंकल्प सादर करणे सरकारला कितपत शक्य होईल याबाबतही प्रश्नचिन्ह आहे. लोकप्रिय अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला नुकसान करील आणि त्याचा राजकीय लाभ मिळेल की नाही, याची शाश्वती नाही असे एक चित्र आहे. तर दुसऱ्या चित्रात आर्थिक आव्हाने लक्षात घेऊन अर्थसंकल्प सादर केल्यास त्याचा राजकीय फायदा सोडाच, तोटा मात्र निश्चित आहे. २००८ ची ही आव्हाने आहेत. त्यांना तोंड देताना डॉ.मनमोहनसिंग सहकार व काँग्रेसची कसोटी लागणार हे निश्चित!

**निरीक्षक**
नवी दिल्ली

# विकास आणि भावनिक मुद्यांना गुजराथी जनतेची साथ

दि. शि. जाधव

विविध वाहिन्यांनी आपल्या सर्वेक्षणातून व्यक्त केलेले अंदाज चुकवत नरेंद्र मोदी काँग्रेसचा सरळ पराभव करून गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी तिसऱ्यांदा विराजमान झाले. काँग्रेसने पूर्ण ताकदीनिशी केलेला प्रचार, पक्षातील अंतर्गत बंडाळी, विरोधातील प्रसारमाध्यमे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषदेची नाराजी या सर्वांवर मात करीत मोदींनी भाजपला ११७ जागा मिळवून दिल्या. या यशाने मोदी 'विजयाचे सौदागर' ठरले आहेत. उत्कृष्ट प्रशासनाच्या साहाय्याने गुजरातचा केलेला विकास आणि लोकांच्या भावनिकतेला घातलेली साद याच्या जोरावर मोदींनी गुजरातची सत्ता पुन्हा काबीज केली आहे. मोदींच्या विजयाकडे वळण्यापूर्वी गुजरातची राजकीय पार्श्वभूमी पाहूयात.

**काँग्रेसकडून भाजपकडे...**

अहमदाबादमधील साबरमती आश्रम गांधीजींच्या स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्वाचे केंद्र होते. स्वातंत्र्यानंतर सरदार पटेलांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचा विस्तार गुजरातमध्ये झाला. १९६२ मध्ये झालेल्या पहिल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ११३ जागा मिळवून काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. या निवडणुकीमध्ये ५० टक्के मते काँग्रेस पक्षास मिळाली. १९६७च्या निवडणुकीत स्वतंत्र पक्षाने काँग्रेसला चांगली टक्कर दिली. काँग्रेसची सत्ता टिकली, मात्र वीस जागांचा फटका काँग्रेसला बसला. स्वतंत्र पक्ष हा श्रीमंत शेतकरी, सरंजामदार, ब्रिटिश परंपरेतील नोकरशहा, संस्थानिक यांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करीत होता. गुजरातच्या राजकारणात उजव्या पक्षांना नेहमीच वाव राहिल्याचे दिसून येते. बांगला देश युद्धातील विजयाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला १४० जागा मिळाल्या. १९७५ ची निवडणूक मात्र बहुरंगी आणि गुजरातमध्ये काँग्रेसचा पहिला पराभव करणारी ठरली. इंदिरा गांधींच्या काँग्रेस (आय)ला पराभूत करून जनता मोर्चा, भारतीय जनसंघ, लोकदल, किसान मजदूर पक्ष यांचे संयुक्त सरकार सत्तेवर आले.

१९८० नंतर काँग्रेसने गुजरातमध्ये 'खाम'नामक यशस्वी प्रयोग केला. खामचा प्रयोग म्हणजे क्षत्रिय (राजदूत व कोळी), दलित, आदिवासी आणि मुस्लिम युतीच्या माध्यमातून ब्राह्मण, बनिया व पाटीदार यांच्या सत्तेला शह देण्याचा प्रयत्न केला. १९८०च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीत दहाने वाढ झाली. १९८५च्या निवडणुकीत काँग्रेसने १४९ जागा पटकावीत सर्वोच्च यश संपादित केले.

१९८५ नंतर मात्र काँग्रेस पक्ष उतरणीला लागला. १९८५ मधील विधानसभा निवडणुकीत जोरदार विजय मिळविलेल्या काँग्रेस पक्षास त्यानंतर लगेच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये भाजपकडून पराभव स्वीकारावा लागला. शहरी भागामध्ये वर्चस्व स्थापित करीत भाजपने महत्त्वाच्या महानगरपालिका ताब्यात घेतल्या. गुजरातमध्ये शहरी भागात २५% लोकसंख्या एकवटलेली आहे. १९९०च्या विधानसभा निवडणुकीत जनता दल आणि भाजपने मिळून काँग्रेसचा पराभव केला. १९९१च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने २६ पैकी २४ जागांवर विजय मिळवून काँग्रेसला हादरा दिला. १९९५च्या विधानसभा निवडणुकीत १२२ जागा मिळवून भाजप पहिल्यांदा स्वबळावर सत्तेवर आला. १९९८ च्या काँग्रेस, भाजप आणि शंकरसिंग वाघेलांचा राष्ट्रीय जनता पक्ष यांच्यात झालेल्या लढतीत भाजप पुन्हा सत्तेवर आला. भाजपच्या गुजरातमधील स्थान बळकटीस अनेक पदर होते. विश्व हिंदू परिषदेने हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांची कट्टर फळी उभी केली. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने संघटनात्मक पातळीवर कार्याची उभारणी केली. आदिवासी भागांकडे विशेष लक्ष केंद्रित केले. २००२च्या निवडणुकीमध्ये दंगलीच्या पार्श्वभूमीवर भाजपने मिळविलेला विजय तर सर्वश्रुतच आहे. दंगलीच्या माध्यमातून मध्यमवर्गीयांमध्ये भीतीची भावना निर्माण करण्यात भाजप यशस्वी ठरला आणि त्याच्याच जोरावर भयमुक्त गुजरातची घोषणा करून सत्तेवर आला.

**नरेंद्र मोदींच्या विजयाने मरगळलेल्या भाजपास उभारी येण्यास मदत होईल. यानंतर येणाऱ्या राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगढच्या निवडणुका भाजपकरिता महत्त्वपूर्ण असतील. आज मोदी भाजपच्या दुसऱ्या फळीतील प्रभुत्वशाली नेते बनवले आहेत, पूर्वीच्या वाजपेयी-अडवाणी या सलामीच्या जोडीत आता अडवाणी-मोदी असा बदल होत आहे. अडवाणी व मोदी हे प्रखर हिंदुत्ववादी म्हणून ओळखले जातात. हिंदुत्वाच्या जोरावर सत्ता मिळविता येत असली तरी ती टिकविण्यासाठी विकास हा करावाच लागतो असे गुजरातच्या निवडणूक निकालावरून म्हणता येईल.**

| प्रमुख पक्षांच्या जागा | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| निवडणुकीचे वर्ष | काँग्रेस | भाजप/जनसंघ | इतर पक्ष | | | |
| १९६२ | ११३ | ०० | २६ (स्वतंत्र पक्ष) | १ (म.गु.ज.प.) | ७ (सोशलिस्ट) | |
| १९६७ | ९३ | ०१ | ६६ (स्वतंत्र पक्ष) | ०३ (म.गु.ज.प.) | | |
| १९७२ | १४० | ०३ | १६ (कॉ.ओ.) | ०१ (कम्युनिस्ट) | | |
| १९७५ | ७५ | १८ | ५६ (कॉ.ओ.) | १२ (कि.मो.लो.प.) | २ (भा.लो.प.) | २ (सोशॅलिस्ट) |
| १९८० | १४१ | ०९ | २१ (कॉ.ओ.) | | | |
| १९८५ | १४९ | ११ | | | | |
| १९९० | २६ | ६७ | ७० (ज.द.) | | | |
| १९९५ | ४५ | १२२ | | | | |
| १९९८ | ५३ | ११७ | | | | |
| २००२ | ५१ | १२७ | | | | |
| २००७ | ५९ | ११७ | ०३ (रा.काँ.) | | | |

१. महागुजरात जनता परिषद, २. किसान मजदूर लोकपक्ष, ३. भारतीय लोकदल, ४. जनता दल, ५. राष्ट्रवादी काँग्रेस.

(निवडणूक आयोग वेबसाईट)

**मोदींचा विजय**

भाजपने २००२ च्या निवडणुकीत मिळविलेल्या जागांच्या तुलनेत यंदा १० जागांची घट झाली आहे, तर काँग्रेसच्या जागांमध्ये ११ जागांनी वाढ झाली आहे, तरीही मोदींचा हा विजय खूप मोठा मानला गेला आहे. २००२च्या निवडणुकीला गोध्रा हत्याकांडानंतर उसळलेल्या दंगलींची पार्श्वभूमी होती. दंगलीनंतर सुशिक्षित शहरी मध्यमवर्गीयांबरोबरच ओबीसी, दलित आणि आदिवासी भाजपच्या बाजूने उभे होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व परिषदेने आपली सर्व ताकद भाजपच्या बाजूने लावली होती. भाजपमधील सर्व गटांनी एकदिलाने काम करून विजय मिळवला होता. मात्र यंदाच्या निवडणुकीतील परिस्थिती वेगळी होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विहिंपने मोदींच्या मनमानीला वेसण घालण्याचे ठरविले होते. सौराष्ट्रात केशुभाई पटेलांनी मोदींची तुलना हिटलरशी करून उघड उघड बंड पुकारले होते. सात बंडखोर आमदार भाजपमधून बाहेर पडून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवीत होते. कांशीराम राणा, सुरेश मेहता हेदेखील मोदीविरोधी अभियानात सामील झाले होते, या सर्वांवर मात करीत मोदींनी गुजरातमधील विजय साकारला.

मोदींनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासाचा मुद्दा प्रभावीपणे प्रचारात मांडला होता. खाजगीकरणाच्या माध्यमातून उपलब्ध केलेली मुबलक वीज, गुजरातभर विनलेले रस्त्यांचे जाळे, जकात रद्द करण्याचा घेतलेला निर्णय, शेती व आरोग्य यांकरिता राबविलेल्या विविध योजना या बाजू प्रचारात ठळकपणे समोर आणल्या. सोनिया गांधींनी केलेल्या 'मौत का सौदागर' या टीकेचे भांडवल करण्यात मोदी यशस्वी ठरले. भावनातून संवाद साधण्याच्या त्यांच्या शैलीने जनतेतील आणि त्यांच्यातील अंतर कमी झाले. काँग्रेसविरुद्ध मोदी अशा रंगलेल्या लढ्यात मोदी यशस्वी ठरले.

| २००७ विधानसभा निवडणूक विभागनिहाय पक्षीय बलाबल | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **विभाग** | **एकूण जागा** | **भाजप** | **काँग्रेस** | **राष्ट्रवादी काँग्रेस** | **अपक्ष** |
| सौराष्ट्र व कच्छ | ५८ | ४३ | १४ | – | ०१ |
| उत्तर गुजरात | ५२ | ३८ | १३ | – | – |
| मध्य गुजरात | ४३ | १८ | २२ | ०२ | ०१ |
| दक्षिण गुजरात | २९ | १८ | १० | ०१ | ०१ |
| **एकूण** | **१८२** | **११७** | **५९** | **०३** | **०३** |

*(दै. सकाळच्या सौजन्याने)*

**सौराष्ट्राने तारले, पण मध्यगुजरात निसटले**

केशुभाई पटेलांच्या नाराजीमुळे सौराष्ट्रात काँग्रेसला जोरदार विजय मिळण्याच्या शक्यता वर्तविल्या जात होत्या, मात्र प्रत्यक्षात भाजपने बाजी मारली. सौराष्ट्रातील मागील जागांच्या तुलनेत भाजपच्या जागा ३ ने वाढल्या. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या मध्य गुजरातमध्ये यंदा काँग्रेसने जोरदार मुसंडी मारली. मध्य गुजरातमध्ये भाजपला २२ जागांचा मोठा फटका बसला तर

काँग्रेसच्या १५ जागा वाढल्या. उत्तर गुजरातमधील भाजपच्या जागांत ५ जागांची वाढ झाली, तर दक्षिण गुजरातेत २ जागांचा फटका बसला.

बहुजन समाज पक्षाने ११६ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते, मात्र बसपाला कच्छ-सौराष्ट्र वगळता इतर ठिकाणी फारशी मते मिळाल्याचे दिसत नाही. कच्छ-सौराष्ट्रामध्ये बसपाने भाजपाच्या विजयास हातभार लावला आहे. भाजप बंडखोरांची मदार असणाऱ्या लेवा पाटीदार आणि कोळी समाजाची मते बहुजन समाज पक्षाकडे वळाल्याने अप्रत्यक्षपणे भाजपचा फायदाच झाला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मध्य गुजरातमध्ये दोन आणि सौराष्ट्रात एक अशा तीन जागा मिळवत गुजरातमध्ये आपले खाते खोलले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्ये झालेल्या युतीचा दोन्ही पक्षांना फायदा झाला आहे. मतविभाजन टाळल्याने मध्य गुजरातमध्ये काँग्रेसला चांगले यश मिळविता आले. शिवसेनेने नरेंद्र मोदींच्या विजयाबद्दल आनंद व्यक्त केला, शिवसेना नेते मनोहर जोशी नरेंद्र मोदींच्या शपथविधीस उपस्थित राहिले, तरी शिवसेनेने भाजपच्या तीन उमेदवारांच्या पराभवास हातभार लावल्याचे दिसून येते.

**मोदी जिंकले आता पुढे काय?**

गुजरातमधील विजय केवळ मोदींचा असल्याचे चित्र प्रसारमाध्यमांकडून रंगविण्यात येत होते. राष्ट्रीय पातळीवरील भाजपा नेत्यांनी हा विजय भाजपचा असल्याची विधाने केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना 'मी पक्षापेक्षा मोठा नाही, आईपेक्षा मुलगा मोठा होऊ शकतो काय?' असे भावस्पर्शी उद्गार मोदींनी काढले. केशुभाई पटेलांच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. यावरून मोदींनी विजयाने हुरळून न जाता सर्वांशी जमवून घेण्याची भूमिका स्वीकारल्याचे दिसून येते.

मोदींच्या विजयाने मरगळलेल्या भाजपास उभारी येण्यास मदत होईल. यानंतर येणाऱ्या राजस्थान, मध्यप्रदेश आणि छत्तीसगढच्या निवडणुका भाजपकरिता महत्त्वपूर्ण असतील. आज मोदी भाजपच्या दुसऱ्या फळीतील प्रभुत्वशाली नेते बनवले आहेत, पूर्वीच्या वाजपेयी-अडवाणी या सलामीच्या जोडीत आता अडवाणी-मोदी असा बदल होत आहे. अडवाणी व मोदी हे प्रखर हिंदुत्ववादी म्हणून ओळखले जातात. हिंदुत्वाच्या जोरावर सत्ता मिळविता येत असली तरी ती टिकविण्यासाठी विकास हा करावाच लागतो असे गुजरातच्या निवडणूक निकालावरून म्हणता येईल.

काँग्रेस मोदींना पराभूत करू शकली असती तर मध्यावधी निवडणुका अटळ होत्या, आता तो प्रश्न मोदींच्या विजयाने मिटला आहे. गांधी घराण्याची पुण्याई प्रत्येक निवडणुकीत विजय मिळवून देईलच असे नाही. विकास घडवून येण्याकरिता निर्णयक्षम प्रशासनाची आवश्यकता असते, याउलट चित्र काँग्रेसशासित राज्यांमध्ये दिसते. काँग्रेस मुख्यमंत्र्याला साधे साधे निर्णय घेण्यासाठीही दिल्लीवारी करावी लागते यामुळे चुकीचा संदेश जनतेमध्ये जातो, काँग्रेसला या परंपरेत बदल करावा लागेल.

मागील गुजरात निवडणुकीतील पराभवानंतर विलासरावांना हटवून सुशिलकुमारांना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आणले गेले होते. आता नारायण राणेदेखील हा मुहूर्त साधण्यास उत्सुक आहेत, याचा निकाल काँग्रेस नेतृत्वाला लावावा लागणार आहे.

**राजधर्माचे पालन**

निवडणुकीत प्रचंड मताधिक्याने हिटलर, मुसोलिनी यांसारखे हुकूमशहादेखील विजयी झाले होते, मात्र त्यांना त्यांच्या दुष्कर्माची फळे शेवटी भोगावीच लागली. मोदींना विकासाची ढाल पुढे करून मानवतेला काळीमा फासता येणार नाही. विकास नेमका कुणाचा करायचा, हेदेखील ठरवावे लागेल. सर्वसामान्यांना फायदा होईल असाच विकास गुजराथी जनतेला अपेक्षित असेल, नाहीतर जनता जितक्या सहजपणे डोक्यावर घेते तितक्याच सहजपणे पायउतार होण्यासदेखील लावते, याचे भान मोदींना ठेवावे लागेल.

**दि. शि. जाधव**
राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
मोबाईल : ९९२१३५८२३४
Email:deepak.Jadhav23@jmail.com

*ह्यांनी नरेंद्र मोदींवर लिहिलेल्या पुस्तकाचं हे हस्तलिखित... मुखपृष्ठासाठी भडक भगव्या रंगाचा कागद वापरावा असं त्यांचं म्हणणं आहे!*



पुस्तक परिचय

# शहीद भगतसिंह : समग्र वाङ्मय

ग. प्र. प्रधान

**क्रांतिकारकांचे मेरूमणी शहीद भगतसिंह यांच्या जन्मशताब्दी निमित्त त्यांच्या विचारांवर आणि व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांच्याबरोबर हुतात्मे झालेल्या क्रांतिकारकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे आणि समता व सामाजिक न्यायासाठी कार्यरत असलेल्या पुरोगामी चळवळींमधील तरुण कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे साहित्य...**

भगतसिंहांचा जन्म २८ सप्टेंबर १९०७ रोजी झाला. ८ एप्रिल १९२९ ला त्यांनी आणि बटुकेश्वर दत्त यांनी केंद्रीय कायदामंडळाच्या इमारतीत बाँब फेकल्यानंतर त्यांना अटक झाली. लाहोर कटाच्या खटल्यामध्ये त्यांना २३ मार्च १९३१ रोजी फाशी देण्यात आले. म्हणजे उणेपुरे चोवीस वर्षांचेही आयुष्य त्यांना लाभले नाही. त्यात दोन वर्षे ते तुरुंगातच होते. म्हणजे त्यांना समजू लागल्यापासून अवघे दहा-अकरा वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले. त्या अल्प काळात त्यांनी केलेले प्रचंड क्रांतिकार्य आणि त्याचबरोबर त्यांनी केलेले वाचन आणि चिंतन यांचा प्रचंड आवाका पाहून माझे मन स्तिमित झाले. २००७ हे शहीद भगतसिंह यांचे जन्मशताब्दी वर्ष. त्यांनी लिहिलेले ७४ दस्तऐवजांचे समग्र वाङ्मय प्रा.चमनलाल यांनी संपादित केले आणि २००४ मध्ये 'भगतसिंह के संपूर्ण दस्तावेज' हा लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. या मूळ संग्रहामध्ये काही लेख व पत्रे समाविष्ट करून एकूण ७० दस्तऐवजांचा मराठी अनुवाद बारा अभ्यासकांनी केला. त्यातील १० दस्तऐवजांचा मराठी अनुवाद चित्रा बेडेकर यांनी पूर्वीच केला होता. भगतसिंहाच्या या सर्व अनुवादित साहित्याचे संपादन करण्याचे काम शहीद भगतसिंह जन्मशताब्दी समितीने श्री.दत्ता देसाई यांच्यावर सोपविले आणि त्यांनी ते समर्थपणे केले. भगतसिंहाचे मराठीतील हे सर्व साहित्य महाराष्ट्र शासनाने किंवा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने करावयास पाहिजे होते. त्यांनी ते केले नाही याचा मला फार खेद वाटतो, संतापही येतो. डायमंड पब्लिकेशनने हे काम स्वीकारून 'शहीद भगतसिंह- समग्र वाङ्मय' (लेख व दस्तऐवज) प्रकाशित केले याबद्दल मी त्यांना मन:पूर्वक धन्यवाद देतो. या ग्रंथाला न्या.पी.बी.सावंत यांनी विस्तृत व अत्यंत मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे, याबद्दल मी त्यांनाही मन:पूर्वक धन्यवाद देतो.

भगतसिंहाच्या या लेख-संग्रहातील 'क्रांतिकारी राजकीय विचार' हा बारा लेखांचा व दस्तऐवजांचा संग्रह, 'धर्म, जात आणि राजकारण' या विभागातील चार लेख 'आणि आंतरराष्ट्रीय विचार'मधील सहा लेख हे अत्यंत मौलिक आहेत. 'धर्म जात व राजकारण' यामधील 'मी नास्तिक का आहे' हा लेख भगतसिंहांचा जीवनविषयक दृष्टिकोन मांडणारा आहे. या लेखातील केवळ काही वाक्येच मी उद्धृत करतो...

१. ''तुमच्या श्रद्धेनुसार हे विश्व सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान अशा विधात्याने निर्माण केले असेल तर... दैन्य आणि यातनांनी भरलेले हे जग, लाखो शोकांतिकांची ही चिरंतन गुंफण, ज्यात एकही प्राणिमात्र सर्वार्थाने समाधानी नाही, हे सर्व त्याने का निर्माण केले?''

२. ''आमचा निसर्गावर विश्वास आहे आणि संबंध पुरोगामी चळवळीची दिशाही आपल्या सेवेसाठी राबविण्यासाठी निसर्ग काबूत आणण्याकडे वळवली पाहिजे. या सर्व सृष्टीला चालविणारी एखादी चैतन्यमय शक्ती तिच्यामागे नाही, हे आमचे तत्त्वज्ञान आहे.''

३. ''जेव्हा एखादा माणूस पाप किंवा गुन्हा करतो तेव्हा अशा माणसाला तो तुमचा सर्व शक्तिमान ईश्वर, त्यापासून परावृत्त का करीत नाही? युद्ध पेटवणाऱ्या सत्ताधीशांना त्याने ठार का केले नाही किंवा त्यांच्यातील युद्धाची ऊर्मी का गाडली नाही?''

धर्म, जात आणि राजकारण या विषयांवर भगतसिंहांनी विपुल वाचन आणि मूलभूत चिंतन केले होते. त्यांनी टॉलस्टॉय यांच्या लेखनाच्या आधारे सर्व धर्मातील सारतत्त्वे एक आहेत, हा मुद्दा मांडला असून धर्मातील रीतिरिवाजांतील अंधविश्वास कसा घातक आहे ते सांगितले आहे.

'क्रांतिकारी कार्यक्रमाचा मसुदा' हा दस्तऐवज फार मौलिक आहे. हा दस्तऐवज आणि भगतसिंहांनी लिहिलेले 'युवा राजकीय कार्यकर्त्यांना पत्र' आजच्या कार्यकर्त्यांनाही मार्गदर्शक ठरतील.

भगतसिंहांनी आंतरराष्ट्रीय क्रांतिकारी चळवळींचा आणि या चळवळींचे अधिष्ठान असलेल्या मूलभूत विचारांचा किती काळजीपूर्वक व सूक्ष्म अभ्यास केला होता याची कल्पना 'किरती' या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी अराज्यवादावर लिहिलेल्या तीन लेखांवरून येऊ शकेल. ते लिहितात, ''खरे पाहता अराज्यवादी हे सर्वांपेक्षा जास्त संवेदनशील, ध्येयवेडे, साऱ्या जगाचे कल्याण इच्छिणारे असतात. त्यांच्या विचारांशी मतभेद राखूनही त्यांचे गांभीर्य, जनतेबाबत त्यांची आस्था, त्यांचा त्याग, त्यांची सचोटी अशा गोष्टींबाबत कोणतीही शंका असू शकत नाही.''

भगतसिंहांनी फ्रेंच तत्त्ववेत्ता प्रुधाँ याच्या विचारांचा आशय सांगून पुढे लिहिले आहे 'अराज्यवाद ज्या आदर्श स्वातंत्र्याची

---

**शहीद भगतसिंह : समग्र वाङ्मय**
**संपादक : दत्ता देसाई**
प्रकाशक : डायमंड पब्लिकेशन, पुणे
मूल्य : ३५०/- रुपये

कल्पना करतो ते आहे संपूर्ण स्वातंत्र्य. अराज्यवादी पुढील तीन गोष्टी या जगातून नाहीशा करण्याची इच्छा बाळगतात–

१. चर्च, ईश्वर आणि धर्म...

२. राज्यसंस्था (सरकार)...

३. खाजगी मालमत्ता...

भगतसिंहांनी प्रिन्स क्रोपोटकिन यांच्या विचारांचे अत्यंत मार्मिक विवेचन केले आहे.

भगतसिंह यांनी स्वत: चौफेर वाचन केले आणि लिहिले; 'चिकित्सकपणा आणि स्वतंत्र विचारशक्ती हे दोन गुण क्रांतिकारकांसाठी अपरिहार्य आहेत... भारतीय क्रांतीचे बौद्धिक अंग हे कमकुवत राहिले आहे. यासाठीच क्रांतिकारकाने अभ्यास व चिंतन-मनन ही आपली पवित्र जबाबदारी मानली पाहिजे.'

भगतसिंह हे ज्याप्रमाणे क्रियावान क्रांतिकारक होते, त्याचप्रमाणे त्यांनी प्रचंड ज्ञानसाधनाही केली आणि म्हणूनच ते चिकित्सक आणि डोळस क्रियावान कार्यकर्ते झाले. या ग्रंथातील नववा विभाग 'क्रांतिकारी चिंतन व अभ्यास एका हुतात्म्याची नोंदवही' असा आहे. भगतसिंहांनी तुरुंगात केलेली ही टिपणे वाचताना, त्यांचा बौद्धिक आवाका किती मोठा होता याची कल्पना येते. चार्लस् डिकन्स, अप्टन सिंक्लेर, बर्नार्ड शॉ, टुर्जेनेव्ह आदी लेखकांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. बर्नार्ड शॉ यांच्या 'मॅन ॲण्ड सुपरमॅन', मेजर बार्बारा या नाटकांच्या प्रस्तावनेतील महत्त्वाचे विचार भगतसिंहांनी नोंदवले आहेत. टुर्जेनेव्ह यांचे निहिलीझमवरचे विचारही या टिपणांमध्ये आहेत.

'एका हुतात्म्याची नोंदवही' यामध्ये एंगल्स यांच्या 'सोशलिझम, सायन्टिफिक ॲण्ड युरोपियन' आणि 'ओरिजिन ऑफ दि फॅमिली' या ग्रंथांतील महत्त्वाच्या विचारांची नोंद आहे. 'राइट्स ऑफ मॅन' लिहिणाऱ्या थॉमस पेन यांचेही विचार येथे आहेत. 'भूक, नैतिकता, मुक्ती, शिकागोचे हुतात्मे' फ्रान्सिस्को फेररने लिहिलेले 'क्रांतिकारकाचे मृत्युपत्र' स्कॉट निअरिंगचा 'माणूस यंत्रासाठी नाही' हा विचार, कार्ल-मार्क्सने लिहिलेल्या 'कम्युनिस्ट जाहीरनाम्यातील' मूलभूत विचार, आदी टिपणे वाचून मी स्तिमित झालो.

भगतसिंहांनी आयरिश क्रांतिकारक डॅन ब्रीन यांच्या 'माय फाइट फॉर आयरिश फ्रीडम' या आत्मकथेचा हिंदी अनुवाद केला होता. त्याचा समावेश या ग्रंथामध्ये केल्यामुळे या ग्रंथाला एक आगळी मौलिकता आलेली आहे.

निकटच्या व्यक्तीला लिहिलेल्या पत्रांमधून व्यक्तीच्या मनाचा आविष्कार होतो. भगतसिंहांची जी पत्रे या संग्रहात आहेत, त्यापैकी कुलबीर या त्यांच्या धाकट्या भावाला त्यांनी लिहिलेले शेवटचे पत्र वाचल्यावर भगतसिंहाचे धीरोदात्त मन आणि त्यांच्या कोमल भावना यांचा आगळा संगम पाहून माझे मन हेलावून गेले.

भगतसिंहाच्या प्रत्येक कृतीला पुरोगामी विचारांचे अधिष्ठान होते. ते कृतिशील विचारवंत आणि क्रांतिकारकांचे मेरूमणी होते. त्यांच्या अद्वितीय व्यक्तिमत्त्वावर प्रकाशझोत टाकणारा हा लेखसंग्रह म्हणजे स्फूर्तीचा अखंड वाहणारा झरा आहे. भारतातील तरुणींना आणि तरुणांना तो अक्षय प्रेरणादायी ठरेल.

**ग. प्र. प्रधान**

# स्मरणचित्रे : क्रांतिकारी शहीदांची

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात जे हुतात्मे झाले त्यांच्यातील अग्रणी शहीद भगतसिंह आणि त्यांचे सहकारी यांच्या जीवनासंबंधी क्रांतिकार्यातील त्यांचे सहकारी शिव वर्मा यांनी लिहिलेल्या 'संस्मृतिया' या पुस्तकाचा चित्रा बेडेकर यांनी केलेला 'स्मरणचित्रे- क्रांतिकारी शहीदांची' हा अनुवाद अलीकडेच माझ्या वाचनात आला. त्यानंतर 'शहीद भगतसिंह- समग्र वाङ्मय' हे पुस्तकही मी वाचले. ही दोनही पुस्तके वाचताना स्वातंत्र्यपूर्व काळात कॉलेज-विद्यार्थी असताना लाहोर कटाच्या खटल्यावरील एक प्रक्षिप्त पुस्तक शिरुभाऊ लिमये यांच्या खोलीवर वाचले होते, त्यावेळी मन कसे थरारून गेले होते याची आठवण झाली. १९४५ साली 'भगतसिंह दि प्रिन्स अमंग मार्टिर्स' हे जोएकिम अल्वा यांनी प्रसिद्ध केलेले पुस्तक वाचले होते, तेव्हाही या थोर क्रांतिकारकाच्या स्फूर्तिदायी जीवनाची व हौतात्म्याची उदात्तता जाणवून मी नतमस्तक झालो होतो. शिव वर्मा यांनी लिहिलेले पुस्तक आणि शहीद भगतसिंह जन्मशताब्दी समितीने प्रसिद्ध केलेले त्यांचे वाङ्मय, ही तरुण कार्यकर्त्यांना अक्षय प्रेरणा देणारी पुस्तके आहेत, त्यांचा अल्पसा परिचय या लेखात मी करून देणार आहे.

१९२० साली म.गांधींनी असहकाराचे देशव्यापी आंदोलन सुरू केले, तेव्हा देशभर चैतन्याची लाट उसळली. परंतु चौरिचोरा येथील एका हिंसक घटनेनंतर गांधीजींनी हे आंदोलन मागे घेतले, त्यावेळी अनेक तरुणांचा तेजोभंग झाला आणि ते सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. भगतसिंह, चंद्रशेखर आझाद आणि त्यांचे सहकारी यांनी एकत्र येऊन क्रांतिकारकांची 'हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन' ही संघटना १९२८ साली स्थापन केली. उत्तर प्रदेशातील हरडोई जिल्ह्यातील शिव वर्मा हे या संघटनेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते आणि या संघटनेच्या पहिल्या केंद्रीय समितीवर त्यांची निवड झाली होती. शिव वर्मा यांनी वयाच्या सतराव्या वर्षी असहकार आंदोलनात उडी घेतली आणि आंदोलन मागे घेतल्यावर शिव वर्मा सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे वळले. १९२९-३० सालातील लाहोर कटाच्या खटल्यात भगतसिंह, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा झाली. इतर काही जणांबरोबर शिव वर्मांना जन्मठेपेची शिक्षा झाली. शिव वर्मा यांनी १६ वर्षे अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये कारावासातील भीषण

---

**स्मरणचित्रे : क्रांतिकारी शहीदांची**
**लेखक : शिव वर्मा**
**अनुवाद : चित्रा बेडेकर**
प्रकाशक : जनशक्ती प्रकाशन, वरळी, मुंबई
मूल्य : १००/- रुपये

हालअपेष्टा सहन केल्या. हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशनमध्ये असतानाच त्यांची मार्क्सच्या विचारांशी ओळख झाली होती. तुरुंगात त्यांनी विपुल वाचन केले आणि ते मार्क्सवादी बनले. सुटून आल्यानंतर शिव वर्मा हे कम्युनिस्ट पक्षाचे कार्य करू लागले. त्यांनी हिंदीमध्ये माओचे चरित्र आणि 'मार्क्सवाद परिचय माला' लिहिली. १९८६ मध्ये त्यांनी 'शहीद भगतसिंह यांचे निवडक लेखन' या मूळ इंग्रजी पुस्तकाचे संपादन केले. त्यांनी अखेरपर्यंत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कार्य केले. शिव वर्मा यांनी 'सस्मृतिया' या पुस्तकात भगतसिंह, चंद्रशेखर आझाद, राजगुरू, सुखदेव, महावीरसिंग, यतींद्रनाथ दास आणि भगवतीचरण वोहरा या त्यांच्या सात क्रांतिकारक सहकाऱ्यांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. या पुस्तकाच्या सुरुवातीस शिव वर्मा यांनी लिहिलेले मनोगत अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्यांनी लिहिले आहे, ''भगतसिंह, आझाद वगैरे साथीदारांनी ज्या ध्येयासाठी आपल्या जीवनाचे बलिदान केले होते, त्याचा केवळ पहिला टप्पा आपण पार करू शकलो आहोत. आपण स्वातंत्र्य मिळवले आहे परंतु शोषण, गरिबी, विषमतेचा शाप अजूनही शिल्लक आहे. समाजवादापासून तर आपण निश्चितच मागे हटलो आहोत. अशा परिस्थितीत, राष्ट्रीय सुरक्षितता, राष्ट्राची पुनर्बांधणी, समाजवाद आणि श्रेणीविरहित समाज स्थापन करण्याच्या संघर्षात आपल्या युवकांना ही रेखाचित्रे थोडी प्रेरणा देऊ शकली... तर त्यातच या रेखाचित्रांची सार्थकता आहे.'

भगतसिंहांचे शिव वर्मा यांनी रेखाटलेले व्यक्तिचित्र अविस्मरणीय आहे. भगतसिंहांनी केलेले चौफेर वाचन, त्यांचे ध्येयधुंद जीवन, त्यांची सुस्पष्ट वैचारिक भूमिका, त्यांचे संघटनाकौशल्य आणि त्यांची समर्पण वृत्ती– सर्व पैलूंच्यावर शिव वर्मा यांनी प्रकाश टाकला आहे. भगतसिंहांच्या खोडकर, थट्टामस्करी स्वभावाचीही झलक शिव वर्माच्या लेखनातून व्यक्त झाली आहे. संघटनेच्या दिल्लीच्या बैठकीत भगतसिंहांनी मांडलेल्या प्रस्तावानुसार संघटनेचे पूर्वीचे नाव बदलून 'हिंदुस्थान समाजवादी प्रजासत्ताक संघ' (हिंदुस्थान सोशलिस्ट रिपब्लिकन असोशिएशन) असे नामकरण करण्यात आले. दिल्लीच्या असेंब्ली भवनात भगतसिंह आणि बटुकेश्वर दत्त यांनी बाँब फेकला त्या प्रसंगाचे शिव वर्मा यांनी केलेले वर्णन चित्तथरारक आहे. लाहोर कटाचा खटला चालू असताना सर्व राजबंद्यांनी केलेल्या उपोषणाचीही शिव वर्मा यांनी साद्यंत हकिगत सांगितली आहे. भगतसिंग राजगुरु, सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. भगतसिंहांच्या आयुष्याचा अखेरचा क्षण जवळ आला असताना त्यांनी सरकारच्या नावे लिहिलेल्या एका पत्रात म्हटले होते...

''लवकरच अंतिम संघर्ष सुरू झाल्याची दुदुंभी वाजेल... साम्राज्यवाद आणि भांडवलशाही यांच्या विरोधातील युद्धात भाग घेतला याचा आम्हाला अभिमान आहे.''

चंद्रशेखर आझाद यांच्या शौर्याचे आणि अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांशी लढत स्वीकारलेल्या हौतात्म्याचे शिव वर्मा यांनी केलेले वर्णन रोमहर्षक आहे.

राजगुरूंचे सुरुवातीचे खडतर जीवन, त्यांचा अवखळ स्वभाव, त्यांना न आवरता येणारी झोप, त्यांची अचूक नेमबाजी, फाशीची शिक्षा झाल्यानंतर त्यांच्या स्वभावात आलेले गांभीर्य आणि 'मृत्यू हे क्रांतिकारकांनी स्वत:च मागून घेतलेले वरदान आहे' हे त्यांचे शब्द– या सर्वांतून राजगुरूंची वास्तव आणि विलोभनीय प्रतिमा शिव वर्मांनी साकार केली आहे.

सुखदेव यांच्या व्यक्तिचित्राच्या अखेरच्या परिच्छेदात शिव वर्मा यांनी लिहिले आहे; 'असा होता सुखदेव– फुलापेक्षा कोमल आणि दगडाहून कठीण. भीती कधी त्याच्याजवळ फिरकली नाही... लोकांनी त्याची फक्त कठोरता पाहिली... परंतु आपल्या कोमल भावनांना, प्रेम आणि ममत्वाला स्वत:ची व्यक्तिगत ठेव समजून अखेरपर्यंत या गोष्टी त्याने आतच दडवून ठेवल्या.'

वेताने मारलेल्या तीस फटक्यांची अमानुष शिक्षा भोगताना 'इन्किलाब जिंदाबाद' ही घोषणा करणाऱ्या, आणि शिक्षा भोगल्यानंतर रक्तबंबाळ अवस्थेतही उन्नत माथ्याने कोठडीकडे जाणाऱ्या महावीर सिंगांच्या छोट्याशा व्यक्तिचित्रातून शिव वर्मा यांनी त्या तरुण क्रांतिकारकाला वाचकांसमोर साक्षात् उभे केले आहे.

राजबंद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीविरुद्ध लाहोर कटाच्या खटल्यातील क्रांतिकारक आरोपींनी जे उपोषण केले ते एक अग्निदिव्य होते. ते अग्निदिव्य करताना, पोटात थैमान घालणाऱ्या क्रुद्ध भुकेला न जुमानता यतींद्रनाथ दास यांनी कणाकणाने मृत्यूकडे सरकण्याच्या केलेल्या प्रवासाचे आणि ६३व्या दिवशी मृत्यूला शांतपणे स्वीकारण्याचे जे वर्णन शिव वर्मा यांनी केले आहे, ते वाचताना या मृत्युंजय क्रांतिकारकांनी त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणीही केलेला क्रांतीचा जयजयकार आपल्या मनात घुमत राहतो.

क्रांतिकारकांचेही काही वेळा परस्परांशी मतभेद होत, परस्परांबद्दल गैरसमजही होत. अशा गैरसमजाची झळ भगवतीचरण वोहरा यांना सोसावी लागली, परंतु ते त्यांच्या ध्येयापासून अविचल राहिले आणि गैरसमजाच्या वादळाला त्यांनी शांतपणे तोंड दिले. भगवतीचरण यांनी लिहिलेल्या 'नौजवान भारत सभेचे घोषणापत्र' या पुस्तिकेत अखेरच्या परिच्छेदात त्यांनी लिहिले आहे... 'मागे राहून काम करणाऱ्या हजारो स्त्री-पुरुषांच्या बलिदानाची राष्ट्राच्या नवनिर्माणासाठी गरज आहे. आपले ध्येय आणि आपला देश यांना आपले आणि आपल्या प्रियजनांचं जीवन यापेक्षा श्रेष्ठ मानणारे ते लोक असतील.'

भगवतीचरण हे असेच अबोल क्रांतिकारक होते. 'बम का दर्शन' या लेखामध्ये क्रांतिकारकांचा उद्देश आणि भावी समाजाच्या रूपरेषेविषयीची त्यांची कल्पना भगवतीचरण यांनी सुस्पष्टपणे मांडली आहे. रावी काठच्या जंगलात बाँबची चाचणी घेण्यासाठी केलेल्या स्फोटामध्ये भगवतीचरण वोहरा मरण पावले. त्यांची अंत्ययात्राही काढणे शक्य झाले नाही. या क्रांतिकारकाच्या शवाचे अखेरचे दर्शनही त्यांच्या पत्नी दुर्गाभाभी यांना घेता आले नाही.

शिव वर्मा यांच्या 'संस्मृतिया' या पुस्तकाचा सुंदर अनुवाद करणाऱ्या चित्रा बेडेकर यांना मन:पूर्वक धन्यवाद.

**ग. प्र. प्रधान**

महाराष्ट्र आरोग्य मंडळ,

माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८.

## साधना शिफारस

संतोष शेणई

### फाळणीचे हत्याकांड ✿ लेझीम खेळणारी पोरं ✿ सिगारेट्स, अलविदा ✿ पावणेदोन पायांचा माणूस ✿ राष्ट्रध्वज ✿ स्टील फ्रेम

#### मानवनिर्मित शोकांतिकेची चिकित्सा

माजी केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले यांचा 'द होलोकॉस्ट ऑफ इंडियन पार्टिशन : ॲन इन्क्वेस्ट' हा महत्त्वाचा ग्रंथ आता 'फाळणीचे हत्याकांड : एक उत्तरचिकित्सा' या शीर्षकाने मराठीत उपलब्ध झाला आहे. भारतीयांना स्वातंत्र्याचा आनंद आणि फाळणीच्या वेदना या दोन गोष्टी एकाच वेळी मिळाल्या. स्वातंत्र्याचा आनंदोत्सव आपण साजरा करीत आलो आणि फाळणीच्या वेदनांनी वेळोवेळी गहिवरलो. पण या दोहोंकडे पुरेशा चिकित्सक दृष्टीने आपण पाहिले नाही. भारतीय स्वातंत्र्यलढ्याविषयी भरपूर लिहिले गेले, पण त्या अभ्यासाच्या क्रमात फाळणीचा विषय नसायचा. बहुतेकदा 'फाळणीच्या आठवणीही नकोत' अशीच त्यामागची भावना असे. स्वाभाविकच फाळणीचा सर्व अंगांनी नीट अभ्यास झाला नाही, त्यामुळे स्वातंत्र्यलढ्याचा इतिहासही अपुरा राहिला. किंबहुना स्वातंत्र्यलढ्याविषयी गैरसमजावर आधारित मिथकेही रूढ झाली. स्वातंत्र्यानंतर तब्बल साठ वर्षांनी या फाळणीचा अभ्यास आपल्यासमोर येतो आहे; त्यातून काही गैरसमज दूर व्हायला आणि दृष्टी निवळायला मदत होईल, असे वाटते.

स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील फाळणीचा कालखंड हा सर्वाधिक वादळी होता. पारतंत्र्यातून मुक्त होऊ पाहणाऱ्या भूमीसाठी तो निर्णायकही होता. या देशाची फाळणी ही एका रात्रीत घडलेली नैसर्गिक घटना नव्हती. त्यामागे अनेक घडामोडी घडत होत्या, त्यातून राजकीय धोरणे आकाराला येत होती. ब्रिटिश, काँग्रेस व मुस्लिम लीग या तीनही पक्षांची याबाबतची धोरणे काय होती आणि त्याचे परिणाम काय झाले हे पाहणे आवश्यक होते. या प्रत्येकाने फाळणीची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलण्याची खबरदारी घेतलेली दिसते. त्यावेळच्या राजकीय चर्चा प्रक्रियेतून या घटनेचा समग्र आढावा घेणे, त्याचा अन्वयार्थ लावणे ही अवघड कामगिरी होती. हा कालखंड म्हटला तर अवघ्या अठरा महिन्यांचा; पण त्याच कालखंडात पूर्वी कधीही नव्हती एवढी गुंतागुंत निर्माण झाली होती. त्यातील प्रत्येक धागा सोडवून कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय निरखणे हे सोपे काम नव्हते. पण श्री. गोडबोले यांनी ते पार पाडले आहे.

असंख्य सरकारी फायली, अहवाल, त्यातील टिपणे यांचा अभ्यास त्यांनी केला आहे. फाळणीशी संबंधित नेत्यांच्या चरित्रातून त्या अठरा महिन्यांचा अभ्यास करून त्यावेळची त्यांची मानसिकता, फाळणीच्या निर्णयापर्यंत पोहोचणारी त्यांची विचारप्रक्रिया यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्नही श्री. गोडबोले यांनी केला आहे.

कोणत्याही चिकित्सेशिवाय आपण काहीजणांकडे फाळणीचे गुन्हेगार म्हणून बोट दाखवत होतो. या पुस्तकाच्या वाचनानंतर आपले दृष्टिकोन, मते तपासून घ्यावी लागतील. या गुंतागुंतीच्या प्रक्रियेत विशिष्ट कोणी एकच गुन्हेगार असू शकत नाही हे पटेल. त्याच वेळी तो निर्णय घेण्यामागे काय विचार होते हेही समजून येईल. त्या दृष्टीने हे पुस्तक मोलाचे आहे.

माझ्या पिढीला फाळणीचा अनुभव नाही; वाचल्या आहेत फक्त थरकाप उडवणाऱ्या कहाण्या. त्यावेळी लक्षावधी निरपराध जीव बळी गेल्याच्या वेदना जरूर होतात. पण फाळणी या घटनेत मानसिक गुंतवणूक होत नाही. त्यामुळे काहीशा अलिप्तपणे आम्ही त्याकडे पाहू शकतो. भारताचा इतिहास व हिंदू-मुस्लिम संबंध लक्षात घेता फाळणी झाली हे योग्यच झाले असे वाटते. एक गोष्ट मात्र लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे सगळ्याच मुस्लिमांना एका पारड्यात टाकता येणार नाही. त्यांच्यामध्येही वांशिक व जातीय भेद आहेत. सुफी संतांच्या शिकवणुकीचाही खोलवर परिणाम आहेत. हे ध्यानात घेऊनही फाळणीकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे लागते. महाराष्ट्राचाच विचार केला तर इतक्या वर्षांनीही भिवंडी व मालेगाव येथील मुस्लिम या समाजात नीट मिसळू शकलेले नाहीत हे मान्य करावे लागते. आणि त्यामागचे कारण वांशिक भेदात शोधावे लागते. याच कारणामुळे, पाकिस्तानचे वेगळे होणे हे भारताच्या आताच्या प्रगतीसाठी, येथील शांतीसाठी, स्थैर्यासाठी लाभदायक ठरलेले दिसेल.

याच कारणासाठी, अखंड हिंदुस्थानचे स्वप्न पाहणे ही स्वतःचीच फसवणूक ठरेल. फाळणीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या प्रश्नांकडे पाहण्याच्या उजव्या व डाव्यांच्याही दृष्टिकोनातील पूर्वग्रह, गैरसमज या पुस्तकाच्या वाचनानंतर दूर होतील, अशी अपेक्षा आहे.

श्री. गोडबोले यांच्या पत्नी सुजाता गोडबोले यांनी या पुस्तकाचा अनुवादही प्रवाही केला आहे. हा अनुवाद सोपा नव्हता. मूळ घटनाच गुंतागुंतीची असल्याने त्याचे प्रतिबिंब ग्रंथलेखनात पडलेले होते. घटनांची, पत्रव्यवहारांची, भाषेची अशी सर्वच प्रकारातील गुंतागुंत जपतही वाट सोपी करत जाण्याचे कौशल्य अनुवादिकेला दाखवावे लागले आहे. काही किचकट तपशीलांमुळे हा इतिहास रटाळ होण्याचा धोका होता; पण त्यातील वाचनीयता अनुवादिकेने जपली आहे.

**फाळणीचे हत्याकांड :**
**एक उत्तर चिकित्सा**
**माधव गोडबोले, अनुवाद : सुजाता गोडबोले**
**राजहंस प्रकाशन, पुणे.**
**पाने : ५३०, किंमत : रु. ४००/-**

## सुबोध सावेल गाणे

‘माझ्या जगण्याच्या प्रक्रियेचा मूळ अजेंडा काय होता?’ या स्वतःलाच पडलेल्या प्रश्नाचा शोध संजय कृष्णाजी पाटील आपल्या ‘लेझीम खेळणारी पोरं’ या काव्यसंग्रहात घेताना दिसतात. खेड्यातील मूळं मातीतल्या ओलाव्यासह टिकवून धरत हा कवी महानगरात वाढतो आहे. त्यामुळे येणारे आंतरिक व बाह्य ताण पेलण्याचा यत्न करतो आहे. ते ताण फारच ताणले गेले की कवी कवितेच्या आधाराला जाताना दिसतो आहे.

या कवितेचं प्रथमदर्शनी लक्षात येणारं वैशिष्ट्य म्हणजे कवीला असलेले जागितक भान. चित्रे-कोलटकर-सारंग यांच्या कवितेत प्रतिमांच्या अंगाने जग व्यक्त होत होते. तर येथे सर्वसामान्य भारतीय माणसाच्या जगण्याच्या दैनंदिन व्यवहारात जागतिकीकरणामुळे पडणाऱ्या थेट प्रतिबिंबामुळे नवे जागतिक भान व्यक्त होते. त्यामुळे केवळ सांस्कृतिक प्रतिमा नव्हे, तर जागतिक-राजकीय-सामाजिक घडामोडींचे आर्त या कवितेत प्रकटलेले दिसते. जागतिक दृष्टिकोनातूनच समाजाच्या वर्तमानाचे तो छेद घेतो. त्यातून समाजजीवनाचे जे दाहक वास्तव समोर येते, त्याने तो अंतर्मुख होतो. मग ‘मुंबई’ला विचारतो – ‘खरेच या पहाटेनंतर तुला उठायचे मिळेल बळ?’ या महानगरातील जीवनसंघर्षाला अत्यंत तीव्रतेने भिडत ‘शांत स्वस्थ झोपलेल्या मुंबईस उद्देशून’ ही कविता तो लिहितो. [ही तीव्रता या कवितेच्या पहिल्या भागात दिसते. नंतरच्या दोन भागांत ओसरलेल्या लाटेसारखे पसरलेल्या मुंबईची जाणीव करून देणारे केवळ तपशील येतात. त्यांचे काव्यात्म विधान बनत नाही.]

कवी प्रशासकीय सेवेत आहे, त्यामुळे वेचक प्रशासकीय शब्दांतून सामाजिक भाष्य धारदार बनते. ‘जन्मतृष्णगळा’, ‘सूर्यवाटा’ असे वेगळे शब्दही कवी योजतो. कधी आकाशवाणीवरील बातमीपत्राचा, तर कधी लोकगीताचा आकृतिबंध वापरत कवी आपले सामाजिक भाष्य तीव्रतेने अभिव्यक्त करतो. ‘जगन ऊठ, कमल ऊठ’ हा पाठ्यपुस्तकातील धडा येथे सामाजिक उपहास करतो. मात्र ही सामाजिक उपहासाची ताकद राजकीय भाष्यात येत नाही. किंबहुना राजकारणाच्या अंगाने जायचे टाळल्याने ती तेवढीशी मर्मभेदी होत नाही. सरळसोट अर्थांच्या ओळी कवी मांडून ठेवतो. कविता दिसणाऱ्या शब्दांहून अधिक काहीतरी सुचवणारी हवी हे येथे घडत नाही. साहजिकच धारदार राजकीय कविता बनण्याची क्षमता ती गमावून बसली आहे. ‘लेझीम खेळणारी पोरं’ ही कविता त्यातील लय, माणुसकीची गोष्ट, गावाच्या ऐक्याची कहाणी यांसाठी लक्षात राहील. संग्रहातील अन्य कवितांमधून कवीला जे अभिप्रेत आहे तेच या कवितेत खूप सहजसुंदर व्यक्त होते.

**लेझीम खेळणारी पोरं :**
**संजय कृष्णाजी पाटील**
**डिंपल पब्लिकेशन, नवघर, जि. ठाणे.**
**पाने : ९६, किंमत : रु. १००/-**

## नाटकी नसलेली नाटके

मनस्विनी लता रवींद्र या तरुण लेखिकेची ‘सिगारेट्स’ आणि ‘अल्विदा’ ही नाटके वाचताना खूप मजा आली. येथे ‘मजा’ हा शब्द त्या कलाकृतींच्या कलात्मकतेच्या आकलनाने होणारा आनंद या अर्थाने वापरत आहे; या कलाकृतींचा भावनिक परिणाम आनंद देणारा नक्कीच नाही; उलट तो अनेक ताण निर्माण करणारा आहे. पण हे ताण निर्माण करण्याची क्षमता हेच या दोन्ही नाटकांचे यश आहे, असे मला वाटते.

या लेखिकेबद्दल आणि दोन्ही नाटकांच्या प्रयोगांबद्दल कुणाकुणाकडून ऐकले होते; पण प्रयोग पाहता आले नव्हते. मात्र या संहितांमधून दिसणारे नाटकही तितकाच आनंद देऊन जाते. या नाटकांमध्ये आहे तरी काय? – तरुणपिढीचे लैंगिक समस्यांसह, समाजातील मूल्यव्यवस्थेने मनात निर्माण केलेल्या प्रश्नांसह, दैनंदिन जगण्याला सामोरे जाणे येथे चित्रित केले आहे. हे या तरुणांचे जगणेच आपण वाचत/पाहात जातो.

ज्येष्ठ नाटककार विजय तेंडुलकर यांनी प्रस्तावनेत, नाटकाला हवे ते नाट्य

नसतानाही आपण नाटकात हरवलो होतो, हे मोठ्या कौतुकाने कबूल केले आहे. कुठेही नाटकी नसल्यानेच या नाटकांमधील पात्रांचे जगणे आपल्याला भावते. गुंता निर्माण करणे आणि नेहमीच्या चाकोरीत तो सोडविण्याचा खेळ खेळणे, त्याचा क्लायमॅक्स साधणे, त्या आधी काही नाट्यमय घडणे यांपैकी काहीच या नाटकांमध्ये घडत नाही. समोरे येतो तो तरुणांच्या जगण्याचा अनुभव. हा जगण्याचा अनुभवच नाट्यानुभव बनतो. त्यामुळेच दोन्ही नाटके ताजी टवटवीत वाटतात. ही नाटके वाचताना 'मजा आली' असे जे सुरुवातीला लिहिले आहे ते यामुळेच. 'परंपरेपासून साफ वेगळे असलेले शंभर टक्के नाटक' असे नेमके वर्णन तेंडुलकरांनी केले आहे.

आपल्या समकालिनांचे भावजीवन फार समंजसपणे, धीटपणे, प्रामाणिकपणे, कोणत्याही आविर्भावाशिवाय, कोणताही अभिनिवेष न बाळगता, अत्यंत आत्मविश्वासाने लेखिकेने उलगडून दाखवले आहे. आपण फक्त त्या जीवनाला विनासंकोच सामोरे जायला हवे.

**सिगारेट्स, अल्विदा :**
**मनस्विनी लता रवींद्र**
**पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.**
**पाने : ८४, किंमत : रु. ९५/-**

■■■

## रंजक कादंबरी

श्रीकांत बोजेवार यांची 'पावणेदोन पायांचा माणूस' ही कादंबरी 'साधना'च्या वाचकांना नवीन नाही. 'साधना'च्या २००५च्या दिवाळी अंकात ती पहिल्यांदा प्रसिद्ध झाली होती. त्यावेळी खरे तर, मला ती कादंबरी अजिबात आवडली नव्हती. ती त्यावेळी का आवडली नसेल, याचा मी आता विचार केला तेव्हा दोन शक्यता समोर आल्या. खरे तर ती दोन्ही बाह्य कारणे आहेत, पण त्यांचाच मनावर अधिक परिणाम झाला असावा, असे आता वाटते.

त्यातील पहिले कारण – 'साधना' दिवाळी अंकाच्या संपादकीयात 'तंबी दुराई स्टाईल'ने लिहिलेली ही कादंबरी असल्याचा उल्लेख होता. 'लोकसत्ता'मधील 'दोन फूल एक हाफ' या तंबी दुराई यांच्या सदरामध्ये सामाजिक-राजकीय परिस्थितीवर विनोदात्म शैलीने केलेले 'भाष्य' असते. पत्रकाराने दिलेला एक मस्त टोला असतो. केवळ फिरकी असे त्या लेखनाचे स्वरूप [काही अपवाद वगळता] नसते. ही 'तंबी दुराई स्टाईल' मी कादंबरीत नकळत शोधायला लागलो होतो. सामाजिक-राजकीय परिस्थितीतील हास्योत्पादक गोष्टींचे खेळकर वृत्तीने केलेले 'चिंतन' मी त्यावेळी कादंबरीत शोधत होतो. ते न सापडल्याने मला त्यावेळी कादंबरी आवडली नसावी.

दुसरे कारण – त्यावेळी कादंबरीच्या सजावटीसाठी वापरलेल्या चित्रांनी माझी दिशाभूल केली होती. साहित्यकृतीसोबतची चित्रे केवळ त्या पानांच्या ले-आऊटसाठी नसतात; ती त्या साहित्यकृतीचा भर कशावर आहे, तिची दिशा काय आहे, हेही सांगत असतात. त्यावेळी वापरलेली बहुतांश चित्रे शृंगारसूचक होती. त्यामुळे, ग्रामीण विनोदाचा मुलामा असलेल्या भानगडकथांहून ही कादंबरी वेगळी नसेल, असा एक पूर्वग्रह मनात तयार झाला होता.

आता दोन वर्षांनी ही दोन्ही कारणे मनात उरली नव्हती, त्यामुळे पुस्तकरूपात आलेल्या या कादंबरीने माझे चांगले रंजन केले. सत्तेच्या अंगणात वाढणाऱ्या दलालांचे, त्यांच्या चातुर्याचे चित्रण किती विनोदात्म ठरू शकते, याचा ही कादंबरी एक उत्तम नमुना आहे. शंकर पाटील यांच्या प्रारंभाच्या काही कथांमधून विनोदरूपाचा कथात्म आविष्कार दिसला होता, त्याची चांगल्या अर्थाने आठवण ही कादंबरी करून देते.

चिं.वि. जोशी हे मानवी नात्यांतील गुंतागुंत, त्यांच्यातील चांगुलपणा किंवा क्षुद्र हेवेदावे, त्यांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी याची मांडणी विरोध-विसंगतीच्या विनोदनिर्मितीच्या आधारे करीत. हा गुण बोजेवारांच्या या लेखनात दिसतो. या लेखनात चार-पाच ठिकाणी शृंगारसूचन (शृंगारीक वर्णन नव्हे) आहे; पण शृंगार व विनोद यांची जुळणी रंजकतेसाठी करण्याचा काही लेखकांचा प्रयत्न असतो, तो इथे नाही. इथे कथेला वळण देणारी 'की' म्हणून शृंगार येतो.

सुखात्म अनुभव देण्याचे सामर्थ्य या लेखनात आहे, कलाकृतीचा एकूण भावनिक परिणाम आनंदरूप होतो. मात्र तरीही, बोजेवारांनी आपल्यातील पत्रकाराला वाव देऊन मर्मभेदी लेखन करण्याची एक संधीही गमावली हे मनात आल्यावाचून राहात नाही.

**पावणेदोन पायांचा माणूस :**
**श्रीकांत बोजेवार**
**देशमुख आणि कं. प्रा. लि., पुणे.**
**पाने : १३८, किंमत : रु. १५०/-**

■■■

## राष्ट्रध्वजाचा इतिहास

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात 'तिरंगा ध्वज' आणि 'वंदे मातरम्' या शब्दांना अनन्य मोल आहे. एखाद्या अस्त्राचे काम या दोन गोष्टींनी केले. देशाच्या गौरवाच्या क्षणी राष्ट्रध्वज फडकत राहिला. प्रत्येक भारतीयाला केवळ राष्ट्राचा ध्वज म्हणून अभिमान नाही, तर त्या ध्वजामागे असलेल्या इतिहासाचा अभिमान असतो. या ध्वजाचा इतिहास,

पंरपरा व सांस्कृतिक स्थान मिलिंद प्रभाकर सबनीस यांनी 'राष्ट्रध्वज : प्राचीन ते अर्वाचीन' या पुस्तकात विस्ताराने मांडले आहे.

केवळ राष्ट्रध्वजाविषयीच नाही, तर भारतीयांनी प्राचीन काळापासून आतापर्यंत वापरलेल्या ध्वजांच्या माहितीचे हे संकलन आहे. पहिल्यांदा ध्वज कधी वापरला गेला या निर्णयापर्यंत सबनीस येऊ शकले नाहीत, मात्र ते जास्तीत जास्त मागे जाण्याचा प्रयत्न करतात. ध्वजसंकल्पनेचे मूळ आदिमानवाच्या जीवनपद्धतीतच असल्याचे दाखवून देतात. वेदवाङ्मयात, रामायण-महाभारतात असणारे ध्वजांचे संदर्भ देतात. प्राचीन भारतातील काही वीर, त्यांच्या ध्वजांची नावे व त्यांची वैशिष्ट्ये सांगतात.

गुढी पाडव्याला उभारल्या जाणाऱ्या गुढीपासून ते सध्याच्या राष्ट्रध्वजापर्यंत 'ध्वज' ही संकल्पना कशी विकसित झाली हे या पुस्तकातून समजून घेता येते. मादाम कामा यांनी स्टुटगार्टमध्ये आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारतीय स्वातंत्र्याची मागणी करीत फडकवलेला ध्वज, हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील पहिला ध्वज होय. 'वंन्दे मातरं' असे शब्द लिहिलेला हा ध्वज आता पुण्यात लोकमान्य टिळक वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतो. राष्ट्रध्वजाचा आकार, रंग ठरवताना काय चर्चा झाली, त्यासाठी लागणारे कापड कुठे तयार होते, राष्ट्रध्वज कुठे बनवला जातो, तो कोण उपलब्ध करून देते यांसारखी माहिती व पूर्ण ध्वजसंहिता या निमित्ताने मराठीत संकलित झाली आहे.

**राष्ट्रध्वज : प्राचीन ते अर्वाचीन**
**मिलिंद प्रभाकर सबनीस**
**स्वानंदी प्रकाशन, पुणे.**
**पाने : ११६, किंमत : रु. १२०/-**

## स्पर्धा परीक्षेसाठी सज्जता

फारुक नाईकवाडे यांचे 'स्टील फ्रेम' हे पुस्तक स्पर्धा परीक्षेला बसू इच्छिणाऱ्यांना प्रेरणा-प्रोत्साहन देणारे आहे. एरव्ही स्पर्धा परीक्षेची पुस्तके म्हणजे 'अपेक्षित प्रश्नसंच' असेच स्वरूप असते. हे पुस्तक मात्र स्पर्धा परीक्षेला सज्ज करणारी मानसिकता घडवणारे आहे.

स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून प्रशासकीय सेवेत महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या काही मित्रांची ही व्यक्तिचित्रे आहेत. पण ही केवळ मित्रांची व्यक्तिचित्रे उरत नाहीत, ती पोलादी चौकटीतील अधिकाऱ्यांची व्यक्तिचित्रे बनतात. श्री. नाईकवाडे यांचे हे सगळेच मित्र सामान्य, मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेले व घरात प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांची परंपरा नसलेले, मराठी माध्यमात शिकलेले आहेत. पण या माणसांमधूनच या देशाला दिशा देणारे प्रशासक निर्माण झाले आहेत. त्यामागची त्यांची स्वयंशिस्त, जीवनसंघर्ष व त्यासाठी लागणारी अफाट जिद्द यांचे दर्शन या पुस्तकात होते. त्यांच्यातील 'माणसा'चेही दर्शन लेखकाने घडवलेले आहे.

यातील प्रत्येकाचे यश मिळवण्यामागचे रहस्य उलगडले आहे. या परीक्षांसाठी अभ्यास कसा करावा, त्यांची पद्धती कशी असावी, परीक्षेतील अपेक्षित प्रश्नांचा विचार कसा करावा, इतरांपेक्षा चांगले उत्तर लिहिण्यासाठी पूर्वतयारी कशी हवी, मुलाखतीची तयारी कशी करावी लागते यांविषयी योग्य मार्गदर्शन करणारे याहून चांगले दुसरे पुस्तक नसावे.

स्पर्धा परीक्षा म्हटली, की प्रशासकीय सेवा व पोलिस सेवा एवढेच सामान्यतः माहीत असते. याखेरीजही असलेल्या अन्य सेवांविषयी, त्यातील कामाविषयी इत्यंभूत माहिती येथे मिळते. नागरी सेवेत मराठी माणूस कमी आहे. जिद्द, चिकाटी, परिश्रम, शिस्त, नियोजन या गुणांच्या आधारे ही टक्केवारी वाढवणे मराठी माणसाच्या हाती आहे. पण याखेरीजही असलेल्या कारणांची मीमांसा, मराठी पालकांची मानसिकता याची चर्चा या पुस्तकात निमित्तानिमित्ताने फार चांगल्या तऱ्हेने करण्यात आली आहे. प्रभावी ललित शैलीत वाचकांना खिळवून ठेवण्याची किमया श्री. नाईकवाडे यांनी येथे साध्य केली आहे.

**स्टील फ्रेम : फारुक नाईकवाडे**
**दि युनिक ॲकॅडमी, पुणे.**
**पाने : २१६, किंमत : रु. २५०/-**

**— संतोष शेणई**
ए-१/३, सुंदर रचना, विठ्ठलनगर,
वडगाव बुद्रुक, पुणे ४११०५१.
मोबाईल : ९८८१०९९०१६.

### प्रकाशकांना आवाहन :

प्रत्येक महिन्यातील पहिल्या अंकात आम्ही सहा नवीन पुस्तकांची थोडक्यात ओळख करून देणार आहोत आणि त्यांची मुखपृष्ठे 'साधना' अंकाच्या मलपृष्ठावर छापणार आहोत. 'वेगळा विषय' आणि 'दर्जेदार लेखन' या दोनच निकषांवर **'साधना शिफारस'**साठी पुस्तके निवडणार आहोत. म्हणून मराठीतील प्रकाशकांना आम्ही आवाहन करतो, आपल्या प्रकाशनसंस्थेने अलीकडच्या दोन-तीन महिन्यांत प्रकाशित केलेल्या वेगळ्या विषयावरील, दर्जेदार पुस्तकाची एक प्रत 'साधना'कडे अवश्य पाठवावी.

**— संपादक, साधना.**

## हात दुखले आणि मनही...

'साधना' दिवाळी अंक पोस्टाने घरी आला आणि दिवाळीची सर्व कामे आवरून मी तो हातात घेतला, चाळला. दुपारी जेवणानंतर निवांत वाचू, या सवयीनं बाजूला केला. कारण वाचनाअगोदर घरातली कामं उरकणं महत्त्वाचं होतं. दुपारी जेवणानंतर वामकुक्षीच्या साथीला 'साधना' अंक हातात घेतला, अन् पडून वाचण्याचा हा अंक नाही म्हणून काही वेळातच उठून अंक मांडीवर ठेवून वाचू लागले.

अतुल कुलकर्णींचा 'मी असा घडलो' हा लेख वाचून होईपर्यंत पायांना प्रचंड मुग्या आल्या, म्हणून अंक बाजूला केला. नंतर त्यातील ग.प्र.प्रधान, सदानंद मोरे, रूपा कुलकर्णी इत्यादींचे लेख बुद्धीला सकस खाद्य पुरवणारे वाटले, पण अंक बाजूला ठेववत नाही आणि वाचनही सलग चालू ठेवणं अवघड झालं 'वजनदार' असल्यामुळे हाताला कळ यायला लागली. मग अंक पोथी वाचण्याच्या स्टँडवर ठेवून वाचला नव्हे खाल्ला. जाहिरातींच्या प्रचंड माऱ्यापुढे अंकाचे वजन वाढतेय व वाचकांना त्रास होतोय, याचा कदाचित संपादकांना विसर पडला असावा. जाहिरातवाल्यांच्या मनाबरोबर वाचकांच्या मनाचाही थोडा विचार झाला असता तर आमचे मन व हात दुखले नसते. हे एवढंच सोडलं तर अंक अतिशय दर्जेदार, सकस व देखणा, उत्कृष्ट आहे. यावर्षीही अंक नंबर वन राहणार यात शंकाच नाही.

**रजनी पांडव**, सी-१, ६ रक्षलेखा सोसायटी, दत्तवाडी, पुणे ३०.

## सर्वथैव असमर्थनीय!

भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात जातींचे अस्तित्व नाकारता येत नाही, हे खरे असले तरी दलितांना आणि सर्व मागास जाती-जमातींना विकासाची विशेष संधी देणे हेच सामाजिक न्यायाला पोषक असून आधुनिक काळाशी सुसंगत आहे. ज्या पांढरपेशा जातींनी आजवर शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये अग्रस्थानी राहून प्रगतीची सर्व फळे चाखली आणि ज्या जातींनी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राजकारणात अमाप सत्ता भोगली, त्यांनी समाजातील मागास व उपेक्षित राहिलेल्या जाती-जमातींना शिक्षण आणि नोकऱ्या यांची जादा संधी देणे हे त्यांचे कर्तव्य आहे. पुण्यामध्ये गेल्या आठवड्यात चित्पावन ब्राह्मणांनी जागतिक संमेलन घेतले आणि मराठा समाजाची परिषद झाली– हे दोनही मेळावे सर्वथैव असमर्थनीय आहेत.

**चंद्रशेखर पिंगळे**, पुणे

## 'साधना'साठी हा प्रकार शोभादायक नाही

संपादक साधना,

२० ऑक्टोबर २००७ च्या 'साधना' अंकात 'आख्यान' सदरात श्री.चंद्रकांत भोंजाळ यांचा 'सारे जहाँ से अच्छा' हा माहितीपूर्ण लेख उत्तम आहे. तो लेख आणि 'नवनीत' या ख्यातनाम हिंदी मासिकाच्या ऑगस्ट २००७ च्या अंकातील डॉ.अबरार रहमानी यांचा याच मथळ्याचा लेख यात विलक्षण साम्य आहे. श्री.भोंजाळ हिंदीत डॉ.अबरार रहमानी या टोपणनावाने लेखन करतात का? नसल्यास, झाला प्रकार 'साधना'साठी फारसा शोभादायक नाही. हिंदीतील लेखाची छायाप्रत सोबत पाठवीत आहे. छाननी करून 'साधना'च्या पुढील अंकात आपण खुलासा कराल असा विश्वास वाटतो. आपल्याला दिवाळीच्या शुभेच्छा.

**ज्ञानेश्वर वि. परुळेकर**, २२/३ सिद्धार्थनगर, नं. ४, गोरेगाव (प.) मुंबई ४०००६२.

० ० ० ० ०

संपादक साधना,

आपले पत्र व त्या सोबत पाठवलेली ज्ञानेश्वर परुळेकर यांच्या पत्राची झेरॉक्स व 'नवनीत'मधील लेखाचे कात्रणही मिळाले. मी 'नवनीत'चा वाचक नाही. मी अनुवाद करीत असतो आणि स्वतंत्र लेखनही करीत असतो. लेखन करण्यासाठी संदर्भ म्हणून वाचनात आलेली माहिती लिहून व अनुवाद करून ठेवण्याची माझी सवय आहे. तसाच हा लेख नकळत ठेवलेला असावा. ऑफिसचे काम, मुंबई-पुणे अपडाऊन या धावपळीत तो आपल्याकडे प्रसिद्धीसाठी पाठविण्यात आला. त्यावेळी तो लेख अनुवादित आहे असा उल्लेख करायचे अनवधानाने राहून गेले. नाहीतर अनुवादक म्हणून माझे नाव छापताना मला कमीपणा वाटण्याचे काहीच कारण नाही. मी अनेक मोठ्या साहित्यिकांच्या कृतींचे अनुवाद त्यांची अनुमती घेऊन, त्यांच्या नावासकटच छापले आहेत, त्यामुळे जाणूनबुजून असे काही करण्याचा माझा उद्देश नव्हता. पण वरील लेख अनुवादित आहे असे छापायाचे राहून गेल्यामुळे कुणी दुखावले गेले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. भविष्यात मी जास्त काळजी घेईन याची खात्री बाळगावी.

**चंद्रकांत भोंजाळ**, २ (तळमजला), सहकारशिल्प, वीरा देसाई मार्ग, मुंबई ५८.

तिरकस चौकस

# मार्केटिंग ओलांडणारी पुस्तके...

एखादं पुस्तक गाजतं म्हणजे काय होतं? एखाद्या पुस्तकाचं आयुष्य नेमकं ठरवायचं कसं? यावर खरं तर साहित्य संमेलनात परिसंवाद वगैरे का होत नसावेत? एखादं पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर ते गाजलं हे मोजायचे पुढील निकष आहेत.

१. त्याचा प्रकाशन समारंभ होणे, २. प्रकाशन समारंभाची बातमी सर्वत्र येणे, ३. वृत्तपत्रात परिचय छापून येणे, ४. 'ललित'सह वाङ्मयीन नियतकालिकात परीक्षण येणे, ५. पुस्तकाला पुरस्कार मिळणे, ६. पुस्तक विद्यापीठाला लागणे, ७. पुस्तकाच्या आवृत्त्या निघत राहणे.

या निकषांवर किती पुस्तके टिकतील? जी टिकतात त्यांना दर्जेदार पुस्तके मानण्याची फॅशन आहे.

त्यातही पुन्हा प्रकाशन समारंभाला ग्लॅमरस पाहुणा लाभला तर पुस्तकाचे मार्क अधिकच वाढतात. बातमी थोडी अलीकडच्या पानावर सरकते. बातमीला चौकटी वाढतात. प्रकाशनाची बातमी सर्व आवृत्तीत आली पाहिजे हा आग्रह लेखकापेक्षा प्रकाशकाचा जास्त असतो. याचे कारण त्यात प्रकाशकाचा जाहिरातीचा खर्च वाचत असतो! पुस्तक सर्वत्र पोहोचते.

वृत्तपत्रात परिचय छापून येणे, वाङ्मयीन नियतकालिकात त्यावर कुणीतरी लिहिणे; या मैदानात मान्यवराने पुस्तकावर लिहिणे याला षटकार दिला जातो. पु.ल.देशपांडेंनी 'बलुतं'वर लिहिल्याने जे घडले तसे काहीतरी घडते. अर्थात 'बलुतं' ऐतिहासिक होतं, पण त्यानंतरच्या काळात पुस्तक गाजवायला मान्यवरांचे परीक्षण हा पॅटर्न झाला! कुसुमाग्रज अनेकांना प्रेमाने प्रोत्साहनपर प्रस्तावना देत. ती प्रस्तावना थेट मलपृष्ठावर जाई व तीच उठून पेपरच्या जाहिरातीत दिसू लागे. पुरस्कार मिळणे हा आता वाङ्मयीन निकष राहिलाच नाही. तो आता संपर्ककौशल्य तपासणारा निकष आहे. विद्यापीठाला पुस्तक लागणे ही भानगडसुद्धा वाङ्मयीन राहिली नाही. पुस्तकाच्या आवृत्त्यांनाही ठोक खरेदी, सवलत, सरकारी खरेदी अशा भानगडी आहेत.

तात्पर्य काय, लेखक कितीही मोठा असला तरी त्याला या सप्तपदी चालाव्याच लागतात.

पुस्तक गाजण्याचे किंवा मान्यतेचे आणखी काही निकष आहेत.

१. एखाद्या अभिनेत्याने/अभिनेत्रीने आवडते पुस्तक म्हणून तुमच्या पुस्तकाचा उल्लेख करणे.
२. एखाद्या नेत्याने साहित्य संमेलनात तुमचा उल्लेख करणे/त्याच्याकडून तुम्ही तसे वदवून घेणे.
३. एखाद्या दिवाळी अंकाबरोबर तुमचे पुस्तक वितरित होणे.

एवढे सगळे वाङ्मयीन व्यवहार माझ्यासकट सर्व वाङ्मयीन लेखकांना करावेच लागतील. अपरिहार्य आहे ते पण खरा प्रश्न पुढचाच आहे. पुस्तक समाजात झिरपते आहे याचा निकष कोणता आहे?

पुस्तक कृत्रिमपणे गाजवलं की ६ महिन्यांनी ते थंड पडतं, असं एक पुस्तक आलं होतं एवढंच लक्षात राहतं. संदर्भ कुठंतरी दिला जातो.

धार्मिक ग्रंथ पोहोचवायला मार्केटिंग करावे लागत नाही. मनोरंजनपर पुस्तके अगदी हातोहात वाचालयातून पोहोचत राहतात. या कृत्रिम मार्केटिंगलाही ओलांडून काही पुस्तकं असतात, ती सारे ठोकताळेच उधळून लावतात.

'एक होता कार्व्हर' असेल किंवा एका महिन्यात संपणारं विज्ञानावरचं 'किमयागार' असेल. शिक्षकदिनाला १५०० प्रती विकल्या जाणारं 'टीचर' असेल किंवा पर्यावरणावर सतत निघलणारी दिलीप कुलकर्णींची, डॉ.नरेंद्र दाभोलकरांची पुस्तके असतील. ही पुस्तकं मार्केटिंग थांबली तरी खपत राहतात. दूर कुठंतरी तालुक्याच्या गावी राहणारा एखादा माणूस पुण्यात येऊन पुस्तकाच्या दुकानात हमखास एखादं पुस्तक विचारतो. ग्रंथप्रदर्शनात तेच पुस्तक विचारतो. वर्षानुवर्षे माणसं एखादच पुस्तक श्रद्धेनं थेट देत राहतात. हे सारं कसं समजावून घ्यायचं? महारथी कर्णाला किरकोळ ठरविणारे अनेक बिल गेट्स आज आहेत तरी 'मृत्युंजय'चं गारूड कायम असतं.

मार्केटिंगला ओलांडून काही पुस्तकं समाजात झिरपत राहतात. त्याचा आधार हा काय असतो? माणसांच्या हृदयाला हात घालण्याची क्षमता ज्या पुस्तकात असते, ती पुस्तकं जगण्याच्या मूलभूत प्रश्नांना हात घालतात. मानवी मनातल्या नैसर्गिक शंकांना जी पुस्तकं उत्तर देतात, ती पुस्तकं उचलली जातात. जो लेखक जितका नितळ, प्रांजळ असतो; तितका तो वाचकांना जास्त भावतो. जुन्या लेखकांपेक्षा नव्या दमाचा लेखकच जास्त भावतो; याचं कारण त्याच्यात सराईतपणा आलेला नसतो. त्याचं नवेपणच वाचक उचलून धरतात.

इलेक्शनच्या एक्झीट पोलला ओलांडून अनेक पक्ष यश गाठतात. त्याच धर्तीवर अनेक पुस्तकं 'मार्केटिंग'ला ओलांडून जातात.

**– हेरंब कुलकर्णी :** चिरेबंदी, मु.पो.ता. अकोले, जि. अहमदनगर ४२२६०१.

एम.डी.नं. ४१ एम.आर. १७ ४/५७
रजि. क्र. एम- २/४१ एम.पी./पीएम उत्तर/ उत्तर/ ४/ २००७- २००८
नि.सिटी/प्रिन्टाईल पत्रानुसार पत्र नं. ७
पोस्टिंग रु.शुल्क मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिस पुणे

ट्रॉट्स्कीने लिहिलेला रशियन राज्यक्रांतीचा इतिहास मी वाचला; आणि मला वाटू लागले की, या ग्रंथाचे भाषान्तर मराठीत करावे. वाटू लागण्याच्या मागोमाग मी प्रत्यक्ष कामालाच आरंभ केला. लेखनाचे काम काही दिवस माझी ज्यू विद्यार्थिनी जेरूशा रूबेन हिने केले. पण बहुतेक सारे काम श्यामा देववर हिने केले. साऱ्या ग्रंथाचे भाषांतर अर्थातच झाले नाही. तरी मोठ्या आकाराचे आठशे चतकोर लिहून झाले. तेव्हा माझी अशी कल्पना होती की, युद्ध संपून मुद्रणसाहित्य पहिल्यासारखे खूप स्वस्त होईल; आणि माझा मीच हा द्विखंडात्मक ग्रंथ प्रसिद्ध करीन. पण युद्ध संपल्यावर दिसू लागले की मुद्रणसाहित्याचे भाव युद्धकाळातल्यापेक्षाही जास्त कडाडले आहेत. तेव्हा कम्युनिस्ट पक्षात असलेल्या एका तरुण गृहस्थाने सांगितले की, ''आम्हीसुद्धा हा ग्रंथ प्रसिद्ध करू.'' पण माझी उभारी आणि त्याची तयारी दोन्हीही खाली बसल्या आणि झाले एवढे भाषांतराचे काम पुरे, असे म्हणून मी ते आठशे चतकोरांचा गठ्ठा तरतुदीने बांधून कपाटात ठेवून दिला.'

'माझा अंदाज असा आहे की काही दिवसांनी या गठ्ठ्यातले कागद शिळे होत जातील, त्यांचे तुकडे पडतील; आणि महिनोन्‌महिने, हातात ग्रंथ घेऊन सांगण्याचे अखंड केलेले श्रम अक्षरश: वाळवीच्या हवाली होतील. श्यामा देववर वजेरूशा यांचे श्रमही वाया जातील. परंतु साहसाला प्रारंभ करताना आपण करीत आहो, हे बुद्धिदृष्ट्या बरोबर आहे अशी माझी खात्री होती; आणि म्हणूनच मी या प्रचंड उद्योगाला लागलो आणि लेखनावर खर्चही बराच केला. मुद्रणसाहित्य स्वस्त होण्याचे तर राहोच, पण ते पहिल्यापेक्षाही महाग होईल याची अटकळ तेव्हा कोणालाच करता येण्यासारखी नव्हती. जर स्वस्ताई असती, तर स्वत:च्या जबाबदारीवर मी पहिला खंड प्रसिद्ध केला असता; आणि लेखिकेला सांगण्याचा दुसऱ्या खंडाच्या भाषांतराचा रतीब अखंड चालू ठेवला असता. पण यातले काहीच व्हावयाचे नव्हते. ट्रॉट्स्कीच्या इतिहासाचे हे आठशे पानी दप्तर माळ्यावर पडलेले आहे.

– श्री. म. माटे

(संदर्भ : चित्रपट – मी व मला दिसलेले जग)

## साधना शिफारस












